७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. २६ मे २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १५० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये



क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


# जवाहर बालभवनाच्या परिसरात मुक्त विज्ञान उद्यान उभारणार : मुख्यमंत्री

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : बालभवनच्या नूतनीकृत इमारतीचे लोकार्पण

**मुंबई (दै. संध्या)**

मुंबईच्या चर्नी रोड परिसरातील महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवनाच्या परिसरात 'मुक्त विज्ञान उद्यान' उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते बालभवनच्या नूतनीकृत इमारतीचे लोकार्पण करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कौशल्य, रोजगार आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार दीपक केसरकर, मुंबईच्या महापौर रितू तावडे, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण विभागाचे आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह, बालभवनच्या संचालक नीता पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



बालभवनच्या नूतन वास्तूची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महानगरपालिका शाळांमधील अधिकाधिक विद्यार्थ्यांना या केंद्राशी जोडण्यासाठी महापौर रितू तावडे यांनी पुढाकार घ्यावा. यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हातभार लागेल.


यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, बालभवन ही केवळ इमारत नसून लाखो मुलांच्या स्वप्नांना आकार देणारे प्रेरणास्थान आहे. नवीन वास्तूमुळे महाराष्ट्रातील बालकांच्या कल्पकतेला नवे पंख मिळतील. मुलांना बालभवनाच्या माध्यमातून खेळ, गायन, नृत्य, चित्रकला, शिल्पकला आणि विविध सृजनशील उपक्रमांद्वारे स्वतःला शोधण्याची संधी येथे मिळते; तसेच त्यांना मातीशी, रंगांशी आणि संगीताशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बालभवन गेली ७५ वर्षे सातत्याने काम करत आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगितले की, ४ ते १६ वयोगटातील मुलांच्या कल्पनाशक्तीला आणि सृजनशीलतेला वाव देण्याचे कार्य ही संस्था सातत्याने करत आहे. नूतनीकरण करण्यात आलेल्या या इमारतीत तळमजल्यावर अत्याधुनिक प्रेक्षकगृह आणि सुसज्ज ग्रंथालय तयार करण्यात आले आहे. पहिल्या मजल्यावर नृत्य दालन, नाट्य कक्ष आणि संगीत कक्ष आहे. दुसऱ्या मजल्यावर विद्यार्थ्यांच्या सादरीकरणासाठी व्यासपीठ; तसेच मूर्तिकला आणि चित्रकला दालने उभारण्यात आली आहेत.

या वास्तूमध्ये १०० विद्यार्थी क्षमतेची तीन सुसज्ज सभागृहे आहेत. एकाच वेळी ५०० विद्यार्थी विविध कलांचे प्रशिक्षण घेऊ शकतील. दररोज ५०० विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षण क्षमतेनुसार महिन्याला सुमारे १० हजार, तर वर्षभरात जवळपास १ लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळू शकणार आहे.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक बालभवन सुरू करण्याचा शालेय शिक्षण विभागाचा मानस आहे, असे शालेय शिक्षण मंत्री भुसे यांनी सांगितले. यावेळी सर जे. जे. कला महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. बालभवनच्या संचालक नीता पाटील आणि सर जे. जे. कला महाविद्यालयाचे संचालक किशोर इंगळे; तसेच कुलसचिव शशिकांत काकडे यांच्यात सामंजस्य कराराच्या प्रतींचे आदानप्रदान करण्यात आले. या करारामुळे विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे कला प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## लातूरमधील प्रसिद्ध डॉक्टर रडारवर

लातूर (दै. संध्या) : नीट पेपरफुटी प्रकरणातील तपासाला आता अधिक वेग आला आहे. आरोपी असलेल्या शिवराज मोटेगावकर यांच्या नातेवाईकांची चौकशी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाशी संबंधित अधिक माहिती गोळा करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. पाचवा डॉक्टरदेखील सीबीआयच्या रडारवर असून, त्याची चौकशी सुरु असल्याची माहिती मिळत आहे.

## धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण, हेमा मालिनी यांनी स्वीकारला

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

सोमवारी राष्ट्रपती भवनात पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वप्रथम दिवंगत चित्रपट अभिनेते धर्मेंद्र यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित केले. त्यांच्या पत्नी अभिनेत्री-खासदार हेमा मालिनी यांनी हा सन्मान स्वीकारला. महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत हिला पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तिच्या नेतृत्वाखाली संघाने यावर्षी एकदिवसीय विश्वचषक जिंकला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ६६ व्यक्तिमत्त्वांना पद्म पुरस्काराने सन्मानित केले. २०२६ मध्ये एकूण १३१ व्यक्तिमत्त्वांना पद्म पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत, त्यापैकी उर्वरित ६५ विजेत्यांना पुढील टप्प्यात सन्मानित केले जाईल, ज्याच्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत.

**■ महिला क्रिकेटची वर्ल्ड चॅम्पियन हरमनप्रीतला पद्मश्री पुरस्कार मिळाला**

भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सोमवारी पद्मश्री पुरस्कारने गौरविण्यात आलं. क्रिकेटमधील योगदानामुळे तिला हा पुरस्कार देण्यात आला आहे. भारताचा चौथा मोठा नागरी पुरस्कार आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात भारतीय संघाने मागच्या वर्षी वनडे वर्ल्डकप जिंकला होता. पहिल्यांदाच भारतीय संघाने जेतेपदाला गवसणी घातली होती. महिला क्रिकेटही कुठे मागे नाही? जेतेपद मिळवून कर्णधार हरमनप्रीत कौरने दाखवून दिलं होतं. हरमनप्रीत कौर पंजाबच्या छोट्याशा शहरातून आली आणि देशाचं नाव मोठं केलं.

## अशोक खरातला ईडीकडून अटक : रोख, मर्सिडीज कार, किलोभर दागिने जप्त

**मनी लाँड्रिंग प्रकरणात मोठी कारवाई**

**मुंबई (दै. संध्या)**

स्वतःला धर्मगुरू म्हणवून घेणाऱ्या आणि आध्यात्मिक उपचारांच्या बहाण्याने कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या नाशिकच्या अशोक कुमार एकनाथ खरात ऊर्फ 'कॅप्टन' याला अंमलबजावणी संचालनालयाने मुंबईतून अटक केली आहे. ईडीच्या मुंबई आंचलिक कार्यालयाने मनी लॉन्ड्रिंग आणि कथित खंडणी प्रकरणाच्या चौकशीनंतर ही मोठी कारवाई केली. आरोपी खरातला १९ मे २०२६ रोजी धन शोधन निवारण कायद्यांतर्गत अटक करण्यात आली असून, मुंबईच्या विशेष न्यायालयाने त्याला २६ मे २०२६ पर्यंत ७ दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे. ही माहिती ईडीने आज त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून दिली आहे.

ईडीने दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी अशोक खरात हा केवळ धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यात गुंतलेला नव्हता, तर या पवित्र क्षेत्राच्या आडून तो एक अत्यंत पद्धतशीर आणि संघटित खंडणीचे रॅकेट चालवत होता. भोळ्याभाबड्या लोकांना आपल्या जाळ्यात ओढून, त्यांच्या मनात विविध भीती निर्माण करून तो त्यांच्याकडून कोट्यवधी रुपये उकळत असल्याचे तपासात उघड झाले आहे. या अवैध आर्थिक व्यवहारांची पाळेमुळे खणून काढण्यासाठी ईडीने मागच्या एका महिन्यात आक्रमक पावले उचलली आहेत. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी अंमलबजावणी संचालनालयाने १३ आणि १४ एप्रिल, १७ एप्रिल, २३ एप्रिल, ५ मे आणि १८ मे २०२६ रोजी आरोपी अशोक खरात आणि त्याच्या निकटवर्तीयांच्या वेगवेगळ्या ठिकाणांवर एकापाठोपाठ एक धाडी टाकल्या. या प्रदीर्घ शोध मोहिमेमध्ये ईडीच्या हाती मोठे घबाड आणि महत्त्वाची कागदपत्रे लागली आहेत. छाप्यात तब्बल १३.९२ कोटी रुपयांची थेट रोकड आणि ५,५०० अमेरिकन डॉलर्स जप्त करण्यात आले आहेत. सुमारे १.१२ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले असून, विविध बँकांमधील २.२५ कोटी रुपयांची रोकड फ्रीज (गोठवण्यात) करण्यात आली आहे. गुन्ह्याच्या पैशातून खरेदी केलेली एक अत्यंत महागडी 'मर्सिडीज बेंज' कार जप्त करण्यात आली असून अनेक बेनामी मालमत्तांचे रेकॉर्ड आणि डिजिटल उपकरणे ईडीने ताब्यात घेतली आहेत.



# 'बंपर लकी ड्रॉ'मध्ये सासवडच्या राजेश जगताप या शेतकऱ्याला मिळाला ट्रॅक्टर

# 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६'चा दिमाखात समारोप

**सासवड (दै. संध्या)**

स्व. चंदुकाका जगताप यांनी स्थापलेल्या शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने सासवड येथील शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' चा आज (दि. २५ मे) प्रचंड उत्साहात समारोप झाला. २२ ते २५ मे या चार दिवसीय प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण असलेल्या 'बंपर लकी ड्रॉ' चे भाग्यवान विजेते ठरलेल्या सासवडच्या राजेश वसंत जगताप या शेतकऱ्याला थेट ट्रॅक्टर बक्षीस मिळाल्याने या महोत्सवाची सांगता अत्यंत दिमाखदार ठरली. या प्रदर्शनातील दुसऱ्या क्रमांकाचे पावर ट्रीलर हे बक्षिस माळेगाव बु. (ता. बारामती) येथील सुरेश पांडुरंग चव्हाण यांना तर तृतीय क्रमांकाचे बक्षीस पावर विडर हे सुनील ज्ञानोबा खटाटे यांसह दररोजप्रमाणे चौथ्या दिवशीच्या शंभर बक्षिसांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सहायक निबंधक सहकारी संस्था (पुणे जिल्हा) प्रकाश जगताप, सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, प्रदर्शनाचे मुख्य आयोजक माजी आमदार संजय जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, समरादित्य जगताप, रमणिकलाल कोठडिया, अशोक वणवे, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, अजय इंगळे, कात्रज डेअरीचे उपाध्यक्ष तानाजी जगताप, निरा बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे, लिना गायकवाड, सुनिता कोलते आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रदर्शनात आधुनिक कृषी औजारे, विविध खते, प्रगत बियाणे, सेंद्रिय खते आणि नाविन्यपूर्ण कृषी उत्पादनांचे स्टॉल्स लावण्यात आले होते. शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन मार्गदर्शक ठरलेच, शिवाय कुटुंबासह येणाऱ्या नागरिकांसाठी व लहान मुलांच्या खेळण्यांसाठीही विशेष व्यवस्था करण्यात आली होती. पुणे जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून आलेल्या हजारो शेतकरी, युवक आणि नागरिकांच्या प्रचंड गर्दीमुळे संपूर्ण मैदान फुलून गेले होते. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी योगदान देणारे संयोजक प्रदीप पोमण, प्रकाश पवार, संभाजी गरुड, विलास जगताप यांसह आशिष गिरमे, रवींद्रपंत जगताप, शेखर जगताप, तुषार जगताप, अक्षय उरसळ, संदीप फडतरे, निलेश गुरव, वेदांत, संभाजी काळाणे, संतोष गिरमे, सुनील जगताप, संतोष सोनवणे, रमेश जगताप, संजय वढणे, डॉ. मनोज शिंदे, बापू मगर, माऊली यादव , संतोष गायकवाड, सोमेश्वरचे संचालक तुषार माहूरकर, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, अजय इंगळे, कात्रजचे उपाध्यक्ष तानाजी जगताप, सुनील खटाटे, सचिन कुंजीर, समरादित्य जगताप, सागर चव्हाण, प्राचार्य नंदकुमार सागर, किशोर शिंदे, रमेश कुसाळकर, चेतन महाजन, आशिष शिंदे, अनिल उरवणे, ओंकार दळवी, स्वप्निल शिवरकर, वैभव शिंदे, राजेंद्र जाधव, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक राजन जगताप, ज्ञानेश्वर गिरमे, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर जगताप तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्था, संत सोपानकाका सहकारी बँक आणि जिल्हा बँकेच्या कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानण्यात आले.





■ सासवड : 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' च्या बंपर लकी ड्रॉ मधील विजेत्या शेतकऱ्याला ट्रॅक्टरचे बक्षीस देताना प्रकाश जगताप, आनंदीकाकी जगताप, माजी आमदार संजय जगताप, राजवर्धिनी जगताप, समरादित्य जगताप, हरीभाऊ लोळे आणि इतर मान्यवर. ■

"मोठ्या शहरात होणारे एक्स्पो ग्रामीण भागात आयोजित करणे, यशस्वी करणे हे मोठे काम आहे. आयोजक माजी आमदार संजय जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप आणि त्यांच्या टिमने या प्रदर्शनाचे अत्यंत देखणे, नेटके आणि सुंदर नियोजन केले त्याबद्दल त्यांचे कौतुक आणि नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्याबद्दल सर्व शेतकऱ्यांच्या वतीने आभार मानले. पुढे बोलताना प्रकाश जगताप यांनी, पुढील काळात जमीनीला आणि कृषी उद्योगांना फार महत्व येणार आहे. कमी जमीनीत नवीन तंत्रज्ञान वापरून उत्पादने घेणे, उत्पादनांची विक्री करणे या प्रदर्शनातून शेतकऱ्यांना पहायला आणि शिकायला मिळाले. यामुळे तालुक्यात कृषी क्षेत्रात नवीन प्रयोग होतील व यामध्ये या "पुरंदर कृषी एक्स्पोचा" प्रदर्शनाचा मोठा वाटा राहिल अशी आशा. पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा."

**- प्रकाश जगताप, जिल्हा सहकारी उपनिबंधक**

### "शेतकरी आणि सहकाऱ्यांच्या परिश्रमांचे फलित!"

"या चार दिवसीय यशस्वी प्रदर्शनाबद्दल मी बहुमोल योगदान देणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचे आणि अहोरात्र कष्ट घेणाऱ्या संयोजक सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. सर्वांच्या सामूहिक परिश्रमांमुळेच हा कृषी सोहळा एवढ्या मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाला."

**— संजय जगताप (आयोजक व माजी आमदार)**

## संपादकीय

# हातात मशीनगन, ओठांवर आत्मबलिदानाची भाषा!

अमेरिका आणि इस्रायलविरुद्धच्या युद्धात इराण सध्या होरपळून निघाला आहे. दोन्ही देशांकडून त्यांच्यावर हल्ले होत आहेत. इराणचं खूप मनुष्यबळ यात कामी आलं आहे आणि त्यांच्या संपत्तीचंही प्रचंड नुकसान झालं आहे. तरीही इराण अजून कोणालाच दाद देत नाही आणि त्यांचेही प्रतिहल्ले सुरूच आहेत. या पार्श्वभूमीवर इराणमध्ये देशप्रेमाचं वारंही भरभरून वाहातं आहे. देशातील युवक आता देशासाठी काहीही करायला तयार आहेत. त्यासाठी प्राणत्याग करण्याचीही त्यांची तयारी आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर सध्या इराणमध्ये आणखी एक वेगळंच वारं वाहतं आहे. इराणमधील अनेक युवक-युवतींनी 'जानफदा' मोहिमेत भाग घेतला आहे. जानफदा याचा अर्थ 'आत्मबलिदान.' देशासाठी आत्मसमर्पण करण्याची तयारी. देशासाठी आम्ही स्वतःचं रक्त सांडायला आणि काहीही करायला तयार आहोत, अशी शपथ अनेक तरुण घेत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून शेकडो इराणी युवक-युवती 'कुर्बानी'ची शपथ घेऊन सामूहिक निकाह लावताहेत. इराणची राजधानी तेहरानमध्ये युद्धाच्या वातावरणात शेकडो जोडप्यांचा नुकताच सामूहिक निकाह लावण्यात आला. या जोडप्यांनी आपल्या विवाहातही 'जानफदा' योजनेंतर्गत देशासाठी आत्मबलिदानाची शपथ घेतली. या जोडप्यांनी सरकारसमर्थित या योजनेंतर्गत युद्धात स्वतःचा जीव कुर्बान करण्याची तयारी दर्शवली आहे. गेल्या काही दिवसांत तेहरानमधील अनेक मोठ्या चौकांमध्ये रात्री हे विवाह समारंभ आयोजित करण्यात आले. मीडिया रिपोर्टर्सनुसार, फक्त इमाम हुसेन चौकातच शंभरहून अधिक जोडप्यांचा निकाह लावण्यात आला. या समारंभांचं प्रसारण सरकारी टीव्हीवरही करण्यात आलं. युद्धाच्या वातावरणात लोकांचं मनोबल वाढवण्यासाठी इराणी सरकार असे कार्यक्रम आयोजित करत आहे. इराणी माध्यमांच्या माहितीनुसार, या तरुणांनी 'जानफदा' योजनेंतर्गत देशाच्या सुरक्षेसाठी काहीही करण्याची तयारी दर्शवली आहे. हे युवक आणि देशातील इतरही नागरिकांनी वीज प्रकल्पांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणांबाहेर मानवी साखळी तयार करून सुरक्षा देण्याची तयारी दर्शवली आहे. संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघेर गालिबाफ आणि राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियन यांच्यासह लाखो लोकांनी या योजनेच्या समर्थनार्थ आपलं नाव नोंदवलं आहे. लष्करी जीपमधून शेकडो वधू-वरांची विवाहस्थळी एन्ट्री झाली आणि मंचावर त्यांनी निकाह केला. एएफपीच्या छायाचित्रांमध्ये अनेक जोडपी मशीनगननं सज्ज लष्करी जीपमधून इमाम हुसेन चौकात पोहोचल्याचं दिसून आलं. तिथं मंचावर मौलवींच्या उपस्थितीत त्यांचा निकाह लावण्यात आला. मंच फुग्यांनी सजवण्यात आला होता आणि तिथं सर्वोच्च नेते आयातुल्ला मोजतबा खामेनेई यांचा मोठा फोटोही लावण्यात आला होता. वडील अली खामेनेई यांची युद्धात हत्या झाल्यानंतर मोजतबा खामेनेई यांना इराणचा सर्वोच्च नेता बनवण्यात आले होतं. माध्यमांशी बोलताना एका वधूने म्हटलं, देश युद्धात आहे; पण देशाविषयीची जाणीव आम्हालाही आहे. एका वरानं सांगितलं, हा दिवस त्यांच्यासाठी खास आहे, कारण तो इमाम अली आणि फातिमा यांच्या विवाहाच्या वर्धापन दिनाशी संबंधित आहे. त्यांना इस्लाममध्ये विशेष आदराचं स्थान आहे.



## संस्कृत सुभाषित

अर्थागमो नित्यमरोगिता च प्रिया च भार्या प्रियवादिनी च । वश्यश्च पुत्रोऽर्थकरी च विद्या षड् जीवलोकस्य सुखानि राजन् ।।

अर्थ – हे राजा, नित्य होत असलेली अर्थप्राप्ती, शरीरस्वास्थ्य, मधुर बोलणारी प्रिय पत्नी, आवडती स्त्री, अर्थ प्राप्त करून देणारी विद्या, आज्ञा पाळणारा पुत्र या सहा गोष्टी म्हणजे जीवलोकातील सुखे आहेत.

## गुरु वचन



### प्रगतीसाठी मत्सर नव्हे, प्रेरणेची गरज

मत्सर करणारा माणूस प्रगती करण्याऐवजी इतरांच्या प्रगतीत अडथळे उत्पन्न करीत असतो. असा माणूस मानसिक कुरापतीमुळे स्वत: महत्त्वकांक्षी नसतोच उलट स्वत:च्या व इतरांच्या प्रगतीतील अडसर असतो. त्याची विकृत व संकुचित मानसिकता म्हणत असते कि, मी बसलो आहे तर तूही पुढे जाऊ नकोस. पुढे जाण्यासाठी, प्रगती करण्यासाठीही मत्सराची नव्हे तर प्रेरणेची गरज असते. एखाद्याला एखादी गोष्ट उत्तमरित्या करताना पाहून त्यापासून प्रेरित होणे व त्यांचे अनुकरण करणे माणसाला झुंजार व प्रगतिशील बनवते. तसेच स्पर्धेची भावना पुढे जाण्यास मदत करते. प्रत्येक यशस्वी व्यक्तिने कोणाकडून तरी प्रेरित होऊन व त्याच्या गुणांचे अनुकरण करूनच यश संपादन केलेले असते. कोणाचा मत्सर करून नव्हे. मत्सरामुळे तर आपले भविष्य व करियर दोन्हीही नष्ट होते. म्हणूनच मत्सर जाळून प्रेरणा पाळायला, जोपासणे आवश्यक आहे.

## उपदेशकथा

दिवस होते पावसाळ्याचे. महात्मा गांधींजीचा आगगाडीनं प्रवास चालू होता. अचानक धो धो पाऊस कोसळू लागला अन् थोड्याच वेळात तर गांधीजींच्या डब्यात वरून पाणी ठिबकू लागलं. गार्डला हे कळलं. तो लगेच गांधीजींच्या डब्यापाशी आला. त्यानं पाहिलं तर ठिकठिकाणी बरेच पाणी ठिबकत होतं म्हणून तो जवळ आला नि गांधीजींना नम्रपणे म्हणाला, 'असं करा, तुम्ही दुसऱ्या डब्यात चला.'

गांधीजी – 'पण मग या डब्याचं तुम्ही काय कराल?'

गार्ड – तुमच्यासाठी पलीकडचा एक डबा रिकामा करवलाय मी; त्यातले लोक येऊन यात बसतील.'

गांधीजी : 'छे, छे असं करणं योग्य नाही. इथे त्यांच्या डोक्यावर नाही का वरून अभिषेक होणार? मग मला काय हरकत इथेच बसायला? मी मात्र सुख भोगायचं नि त्या बिचाऱ्या दुसऱ्यांनी माझ्यासाठी दु:ख सहन करायचं हे कसं चालेल ! इथेच बसतो मी.' गार्ड सूज्ञ होता. त्याने विचारलं, 'बापू, माझ्यालायक काही सेवा?'

गांधीजी : 'उगीच कोणाला त्रास देऊ नको, अन् लाचबीच घेत जाऊ नका, हीच सेवा !'

कथा उपदेश : जो दुसऱ्याचे दु:ख जाणतो व दुसऱ्यासाठी स्वत: त्रास सहन करतो तोच खरा नेता होऊ शकतो.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:एकादशी (अहोरात्र) |
| २६ मे २०२६ | नक्षत्र:हस्त २९:५६:२७+ |
| मंगळवार | योग:सिद्ध २७:०९:५५+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:वणिज १७:४३:१० |
| अधिक ज्येष्ठ | करण:विष्टि (अहोरात्र) |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:कन्या |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – ९ |
| शुक्ल पक्ष | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९६०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | | | | 6 | 4 | 7 | |
| 6 | | 7 | 9 | 4 | | | | |
| | 3 | 2 | | | 7 | | 1 | 6 |
| | | | 1 | | 8 | | | 3 |
| | 9 | | 2 | | 5 | | 8 | |
| 8 | | | 4 | | 3 | | | |
| 7 | 4 | | 6 | | | 8 | 9 | |
| | | | | 1 | 9 | 2 | | 5 |
| | 2 | 1 | 5 | | | | 6 | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९५९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 5 | 8 | 3 | 6 | 9 | 1 | 7 | 2 |
| 1 | 9 | 7 | 2 | 5 | 8 | 4 | 3 | 6 |
| 2 | 6 | 3 | 7 | 4 | 1 | 5 | 9 | 8 |
| 6 | 3 | 4 | 8 | 1 | 2 | 9 | 5 | 7 |
| 7 | 2 | 1 | 5 | 9 | 6 | 3 | 8 | 4 |
| 9 | 8 | 5 | 4 | 7 | 3 | 2 | 6 | 1 |
| 8 | 1 | 2 | 6 | 3 | 5 | 7 | 4 | 9 |
| 3 | 4 | 9 | 1 | 8 | 7 | 6 | 2 | 5 |
| 5 | 7 | 6 | 9 | 2 | 4 | 8 | 1 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०९६१ – जर्मन राजा ओट्टो दुसरा याला राजमुकुट घालण्यात आला.
- १९९४ – प्रसिद्ध पॉप गायक मायकल जॅक्सन याचा इलवीस सोबत लग्न झाला.
- १९८६ – युरोपमधील देशांनी युरोपीय संघाचा झेंडा स्वीकारला.
- २००७ – पूर्व पाकिस्तानमध्ये पोलिसांनी एका रुग्णालयाचे मालक व तीन डॉक्टरांसह सहा लोकांना किडनीच्या अवैध व्यापार व प्रत्यारोपण प्रकरणी अटक केली.
- २००८ – नेपाळचा गोलंदाज मेहबुब आलम याने आंतरराष्ट्रीय एकदिवशीय क्रिकेट (वनडे) सामन्यात मोझाबिक्यू संघाविरूद्ध १० बळी घेवून विश्वविक्रम केला.

### राष्ट्रीय

- १९९९ – भारत–पाकिस्तानमध्ये कारगिल युद्धाची सुरुवात.

### जन्म

- १५६६ – तुर्कीचे सुलतान मोहम्मद तिसरा यांचा जन्म.
- १७९९ – रशियन कवी आणि साहित्यिक अलेक्झांडर पुश्कीन यांचा जन्म.
- १८८५ – राम गणेश गडकरी, मराठी नाटककार, विनोदकार आणि कवीचा जन्म.
- १९०६ – बेंजामिन पिअरी पाल, भारतीय कृषी वैज्ञानिक व संशोधकाचा जन्म.

### निधन

- १४२१ – तुर्कीचे सुलतान मोहम्मद पहिला यांचे निधन.
- १९४४ – दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू सी.एम. फ्रेंकोस याचे निधन.
- २००० – चित्रकार प्रभाकर शिरुर यांचे निधन.
- २००८ – प्रसिद्ध बॉलीवुड चित्रपट निर्माते झमू सुगंध यांचे निधन.

## : SMS :

Buhat Dukh Hoa Tumharay Husband Ke Death Ka.. Chalo Ab Udas Mat Ho, Mein Hon Na.

.
.
.

Film Dekhnay Chalatay Hain.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९ | २६.९ |
| अहमदनगर | ३९.२ | २५.७ |
| अकोला | ४५.५ | ३२.६ |
| अमरावती | ४३.५ | ३४ |
| बीड | ४६.१ | ३६ |
| भंडारा | ४४.८ | २९.६ |
| बुलढाणा | ४१.३ | २७.५ |
| चंद्रपूर | ४५.७ | ३३.८ |
| चेन्नई | ४६.४ | ३५.१ |
| नवी दिल्ली | ४२.६ | ३०.७ |
| धुळे | ४४.५ | २९.४ |
| गोंदिया | ४२.७ | २९ |
| जळगाव | ४६.४ | ३१.७ |
| कोल्हापूर | ३६.१ | २५.५ |
| लातूर | ४०.७ | २९.४ |
| मुंबई | ४०.९ | ३५.६ |
| नागपूर | ४३.८ | ३०.४ |
| नांदेड | ४४.३ | ३२.४ |
| नंदूरबार | ४१.५ | २७.३ |
| नाशिक | ३८.६ | २६.५ |
| पुणे | ३५.५ | २५.३ |
| पंढरपूर | ४२.१ | २७.५ |
| सातारा | ३८.३ | २५.८ |
| सांगली | ३८.८ | २५.८ |
| सोलापूर | ४२.३ | ३०.१ |
| वर्धा | ४४.७ | ३४.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पश्चिम सरकारी कामे वेळेवर पूर्ण होण्याची शक्यता आहे. मौजमजा करण्याकडे कल वाढेल.

**तूळ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण दुसऱ्यावर विश्वास न ठेवता स्वत:च्या विचाराने काम करा.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पश्चिम शुभ, मंगल आणि धार्मिक कार्यात पैसे खर्च होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण अपेक्षेपेक्षा जास्त फायदा झाल्यामुळे मन प्रसन्न राहील. विरोधकांपासून सावधान रहा.

**मिथून :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : उत्तर विनम्रतेने आणि सामंजस्याने कामे केल्यास प्रत्येक कामात यश मिळण्याचा योग आहे.

**धनू :** धनु: शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व नवीन संबंध निर्माण होतील. सदभाव ठेवा योग्य फळ मिळेल. व्यापारामध्ये विस्तार होण्याचे योग आहेत.

**कर्क :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : उत्तर सत्कार्याची आवड निर्माण होईल. फायद्याचे अनेक मार्ग सापडतील. कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर :** शुभ रंग : जांभळा,शुभ दिशा:उत्तर उद्योगधंदा साधारण राहील. प्रयत्न अधिक केल्यास कामात जास्तीचे यश मिळू शकते.

**सिंह :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण प्रतिष्ठित लोकांशी भेटी होतील ज्याचा फायदा भविष्यात आपल्याला मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण चांगली बातमी आपला उत्साह वाढविणार आहे. काम करण्याच्या स्थितीत सुधारणा होईल.

**कन्या :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : दक्षिण अचानक लाभ होऊन आपल्याला प्रसिद्धी मिळू शकते. व्यापारामुळे प्रवास होऊ शकतो.

**मीन :** शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: उत्तर एखादी आनंदाची बातमी मनाची प्रसन्नता वाढवील. मुलांसंबंधातील कामात प्रगती होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९६०



### आडवे शब्द

१. चिंचा आल्यात पाडाला– या गीतातील पुढील ओळ
७. वैदूकडची औषधे
१०. थेट, सरळ
११. हा खाताना घशात काटा अडकतो
१२. मालाचा उठाव
१४. मिळाला म्हणजे फायद्याचाच ठरला की!
१५. जिजाबाईंचा पुत्र
१७. जिरवण्याची ताकद
२०. आवडता, प्रिय
२१. नंतरचे नवराबायको
२२. नमुनेदार
२५. दक्षिणा वाटण्याची जागा
२७. अति भयानक
२९. रेशमाची गुंडाळी (अ.व.)
३०. 'कँटीन' असल्यावर हा कशाला?
३३. भलतेच विरुद्ध
३५. निर्बुद्ध, ढ
३६. दोनवेळा म्हटल्यास कटकट
३७. या काळातील घटना कुणाला कळल्यात!
३८. चकमक
४०. त्वरित, रातोरात
४१. रानरेडा
४२. नातवंडे म्हणजे दुधावरची ––!
४३. दुलई
४४. उत्तराधिकारी
४७. फटाक्यात ठासून भरलेला मसाला
४८. काळ्या तोंडाचे माकड
५१. खोदकाम
५२. लिंबूपाणी
५४. न्याहरी–कधी उपासाची, कधी दिवाळीची!
५५. दुसऱ्यासाठी खिशाला चाट
५७. ओळख पटवणारे वैशिष्ट्य
५९. संपणे
६०. जन्मदाता, पिता
६१. माळी
६३. जगातील सगळ्यात घातक कीटक
६५. 'आ'काराची रेषा
६६. आमिषादाखल दाखवण्याचे कंदमूळ
६७. हे शहर काही आता पेन्शनरांचे राहिलेले नाही
६८. पंख
६९. किमान हालचाल
७१. वृद्ध
७२. '––सांगे ज्याला त्याला, वेड लागले राधेला'
७३. धमनी
७४. लोकरूढी, प्रथा
७७. बूड
७८. कोंब, अंकुर
७९. भिंतीवरून सरपटणारा प्राणी
८०. कबूतर
८१. दक्ष, दक्षतेचा इशारा

### उभे शब्द

१. जादूगाराचे कौशल्य– शर्विलकाच्याही हाती
२. शेवट
३. हुबेहूब सोंग वठवणारा
४. घराची अब्रू घालवणारा
५. शंकराचे एक नाव
६. तिबेटी धर्मगुरु
७. पत्ता, शोध
८. तट्ट, फुगलेले
९. लक्ष पण अवधान नाही
११अ. गणेशमंदिरामुळे प्रसिद्ध असलेली पुण्यातील बाग
१३. मजल, टप्पा
१६. नियमित यात्रा करणारा
१८. भरपूर कमाईचे 'जाडजूड; विशेषण
१९. दरी
२२. बांधकामासाठी कालवलेले मिश्रण
२३. फुलांचे दागदागिने
२४. टाळ्यांचा आवाज
२६. सुकवलेली काळी द्राक्षे
२८. रात्रभर
३१. लहान मूल
३२. आदित्यवार
३४. संत ज्ञानेश्वारांनी केलेली प्रार्थना
३५. बंदी, मज्जाव
३७. शिवशाहीचा ध्वज
३९. लिहिलेला लेख, संदेश इ.
४०. बांबूची मोठी टोपली, हारा
४५. एकरुप
४६. काम इ. लांबणे
४८. वारा, वायू, त्रास
४९. कच्चे लिखाण (इंग्रजी)
५०. वेदनेने ओरडणे, हळहळ व्यक्त करणे
५२. हुक्की, लहर
५३. अव्यवस्था, गोंधळ
५५. पाठशिवणीचा खेळ
५६. –– ––– म्हणून लांडोरही नाचते (म्हण)
५७. हिंदीत रक्त
५८. चक्र
६०. पशू
६२. पुरुष
६४. राजाचा सैनिकी अधिकारी
६५. कान व डोळा यामधील भाग
६७. प्राचीन, जुने
७०. टक, दृष्टी
७५. कोरा
७६. त्याप्रमाणे

### जम्बो शब्दकोडे क्र. ९५७ चे उत्तर

आडवे उत्तर १.मेंदीच्या पानावर मन अजून झुलते ग १०.चकार ११.टन १२.पारावार १३.वसाहत १५.जकातनाका १६.रपाटा १७.कसकस २१.जनकजननी २६.मणेर २७.माननीय २९.जरतर ३०.पाचर ३२.कान ३३.सदाचार ३५.नमन ३७.कसदार ३९.तन ४२.वाम ४४.रसदार ४६.कद ४७.हकनाक ४९.चालवत ५०.चुचकारणे ५३.सान ५४.रत ५५.कल ५६.सारस ५८.कनकचंपक ६१.तार ६२.पोत ६४.अज ६५.पळापळ ६६.अनेक ६८.सापत्नभाव ६९.कर्म ७०.दासबोध ७१.यवन ७२.जागता ७४.अरब ७५.नापेर ७६.कवळणे

उभे उत्तर : १.मेंढपाळ २.पाचर ठोकणे ३.नार ४.वरवर ५.मनोहर ६.अट ७.जून ८.झुणकाभाकर ९.गळका १४.तपासनीस १८.समरस १९.सरकार २०.मामा २२.नजर २३.जतन २४.नरम २५.कृपा २८.यदा ३१.चकमक ३४.चाकरचुकर ३६.नगद ३८.दाहक ४०.नरवर ४१.पोरका ४२.वाहतूक ४३.अचानक ४५.सतत ४६.कणेर ४८.नाटक ५१.चल ५२.रसातळास जाणे ५३.साप ५७.सढळ ५९.नमुनेदार ६०.चंद्र ६१.ताज ६२.पोप ६३.रत्नहार ६४.अवयव ६७.कसब ६८.साधना ६९.कनक ७३.ताळा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.




## महाराजांच्या मंदिरासाठीचा निधी औरंगजेबाच्या कबरीला दिल्या जाणाऱ्या निधीपेक्षा कमी !

पुणे (दै. संध्या)

■ छत्रपती शिवाजी महाराजांच्या एकमेव मंदिराची उपेक्षा कधी थांबणार?

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंधुदुर्ग किल्ल्यावरील 'श्री शिवराजेश्वर मंदिरा'साठी तब्बल ५५ वर्षांनंतर शासनाने वार्षिक निधी ३ हजार रुपयांवरून १ लाख रुपये केला खरा; मात्र हा वाढीव निधी क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीच्या खर्चापेक्षा कमी आणि अत्यंत तुटपुंजा आहे. औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीसाठी वर्षाला २ लाख ५५ हजार १६० रुपये (वर्ष २०२२-२३) आणि महाराष्ट्राच्या आराध्य दैवताला मात्र १ लाख, हे अत्यंत क्लेशदायक आणि दुर्दैवी आहे. हा छत्रपती शिवरायांचा अवमान आहे. उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांनी महसूल विभागाच्या प्रधान सचिवांना दर महिन्याला ५० हजार रुपयांचा निधी देण्याचे निर्देश दिले होते; मग हा निधी कमी कसा काय झाला ? प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या लेखी छत्रपती शिवरायांचे मूल्य औरंगजेबापेक्षा कमी आहे का, असा संतप्त सवाल हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक श्री. गोविंद भारद्वाज यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

रत्नागिरी येथे झालेल्या या पत्रकार परिषदेला श्री. संजय जोशी (राज्य समन्वयक, महाराष्ट्र मंदिर महासंघ), श्री. मयूर भितळे, (रत्नागिरी विभाग प्रमुख, गड किल्ले संवर्धन प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य), श्री. अरविंद बारस्कर (शिवचरित्र कथाकार), श्री. दीपेश वारंगे (जिल्हाध्यक्ष, गड किल्ले संवर्धन प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य), अधिवक्ता अमित काटे आणि श्री. सोहम खानविलकर (श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, रत्नागिरी) आदी मान्यवर उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून हिंदु जनजागृती समिती, हिंदु विधीज्ञ परिषद आणि शिवप्रेमी हा निधी वाढवण्यासाठी संघर्ष करत आहेत. महायुती सरकारने नुकताच २० मे २०२६ रोजी शासन निर्णय काढून श्री शिवराजेश्वर मंदिराचे वार्षिक अनुदान १ लाख रुपये केले. वरवर पाहता ही वाढ चांगली वाटत असली, तरी वास्तवात हा निधी आताही अत्यंत अपुरा आहे. माहितीच्या अधिकारातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून औरंगजेबाच्या कबरीच्या देखभाल दुरुस्तीसाठी वर्ष २०२२ आणि २०२३ मध्ये तब्बल २,५५,१६० व २,००,६२६ रुपये निधी दिला गेला आहे. म्हणजेच, हा निधी छत्रपतींच्या मंदिराला घोषित निधीपेक्षा दुप्पट आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### सायली अगावणे, आर्यन राठोड यांना यंदाचा कसबा गौरव पुरस्कार

पुणे (दैनिक संध्या) : श्रुतीसागर आश्रम फुलगांव पुणे संचलित कसबा संस्कार केंद्राच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात यंदाचा कसबा गौरव पुरस्कार राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त नृत्यांगना सायली अगावणे, आंतरराष्ट्रीय जलतरणपटू आर्यन राठोड यांना प्रदान करण्यात येणार आहे. रविवार, दिनांक ३१ मे रोजी सायंकाळी ५.१५ वाजता सदाशिव पेठेतील उद्यान प्रसाद कार्यालयात हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती केंद्राचे प्रमुख संयोजक अनिल दिवाणजी व अनघा दिवाणजी यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला सहाय्यक सहकारी वसुधा वडके, अपेक्षा राऊत, प्रीती नायकवडी, आर्या परदेशी चैत्राली सरमहाले, नामदेव समाज उन्नती परिषद पुणे अध्यक्ष संदीप लचके, कौस्तुभ आगवेकर, पियुष शहा, विजय घाणेकर, गौरी गुमास्ते उपस्थित होते. कार्यक्रमात कसबा कार्य गौरव पुरस्कार पत्रकार सारिका रोजेकर आणि नाट्य प्रशिक्षक अमृता जोगदेव यांना तसेच बाल गौरव पुरस्कार आहान मोदी व जिम्नॅस्टिक्स खेळाडू अहिल्या आदमणे यांना प्रदान करण्यात येणार आहे. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. कार्यक्रमाला माताजी स्वामिनी स्थितप्रज्ञानंद सरस्वती या अध्यक्षस्थानी असून सामाजिक कार्यकर्ते डॉ.मिलिंद भोई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

### पंडित जवाहरलाल नेहरु पुण्यतिथी निमित्त पुस्तक प्रकाशन कार्यक्रमांचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष व्याख्यान व पुस्तक प्रकाशन कार्यक्रम बुधवार, दि. २७ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता. एस. एम जोशी सोशालिस्ट फॉऊंडेशन सभागृह, नवी पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे . 'नेहरू प्रणित भारताच्या विकासाचे प्रतिमान आणि त्यांची प्रसंगीकता ' या विषयावर मा. खासदार व मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि. चे मुख्य मार्गदर्शक डॉ. विवेक सावंत हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवतील. तसेच लेखक अ‍ॅड. शंकर निकम लिखित 'भारताचा कोहिनूर' या पुस्तकाचे प्रकाशन याप्रसंगी करण्यात येणार आहे. याचे संयोजन महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल यांनी केल्याची माहिती महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांनी दिली.

### पंतप्रधान मोदी यांना 'महागाई रत्न' पुरस्कार जाहीर : पुणे शहर महिला कॉँग्रेसची घोषणा

पुणे (दैनिक संध्या) : केंद्रातील भाजप सरकारने गेल्या १२ वर्षात महागाईचा कळस गाठला, यामुळे या सरकारचे नेतृत्व करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'महागाई रत्न' पुरस्कार देण्याची घोषणा पुणे शहर महिला कॉँग्रेसच्या अध्यक्षा स्वाती शिंदे यांनी केली आहे. पंतप्रधान मोदी यांनी पुरस्कार स्वीकारण्यासाठी पुण्यात यावे, अशी विनंती करणारे पत्र महिला कॉँग्रेसच्यावतीने पाठविण्यात आले असून पंतप्रधान मोदी हा पुरस्कार स्वीकारतील, अशी खात्री या पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. पंतप्रधान पुरस्कार स्वीकारण्यासाठी येतील तेव्हा हजारो लाडक्या बहिणी 'अस्से कमळ नको ग बाई' हे समूहगीत सादर करतील, असेही पत्रात म्हटले आहे. आपल्या देशात घरगुती व व्यापारी गॅस, पेट्रोल, डिझेल, सी.एन.जी, धान्य, खते, दूध, अंडी, भाजीपाला, प्रवास अशा साऱ्याच स्तरांवरील महागाईमुळे जनता होरपळून निघत आहे. आपल्या १२ वर्षांच्या दिशाहीन कारभाराची ही फळं आहेत. असे पंतप्रधानांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. मोदी सरकारची आर्थिक धोरणं चुकीची ठरलेली आहेत. त्याचे दुष्परिणाम सामान्य भारतीयांना भोगावे लागत आहेत. लोकांच्या भावना आणि संताप व्यक्त करण्यासाठी आम्ही 'महागाई रत्न' पुरस्काराची घोषणा केली आहे, असे स्वाती शिंदे यांनी स्पष्ट केले.

# संगीताला जात-धर्म नसतो : डॉ. श्रीपाल सबनीस

## आदिश जैन फाउंडेशनच्या वतीने शुभंकर कुलकर्णी याला नवोन्मेष पुरस्कार प्रदान

पुणे (दै. संध्या)

स्वरांमध्ये सुद्धा अध्यात्म असते. संगीताच्या आत्म्याचा हुंकार म्हणजे संगीताचे स्वर आहेत. संगीताला जात-धर्म नसतो, असे मत ज्येष्ठ साहित्यीक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले. आदिश जैन फाउंडेशन च्या वतीने नवोन्मेष पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन सदाशिव पेठेतील अक्षरवेल सभागृहात करण्यात आले होते. यावेळी प्रतिभावंत युवा गायक शुभंकर सलील कुलकर्णी याला डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी



कवी गझलकार म. भा. चव्हाण, फाउंडेशनच्या अध्यक्ष मृणाल जैन, कवयित्री ललिता सबनीस आणि प्रसिद्ध संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या द्वितीय सत्रात मृणालिनी कानिटकर, सुजाता पवार, अपर्णा आंबेडकर, योगिनी जोशी, मनीषा सराफ,आशा कामे, दत्तू ठोकळे, अशोक भांबुरे यांच्या स्वरचित गाण्याची मैफल संपन्न झाली.

शुभंकर कुलकर्णी म्हणाला, मी आज जिथे आहे, तिथे पोहोचण्यात माझ्या आई-बाबांचा, आजीचा आणि अगदी ड्रायव्हर काकांचाही मोठा वाटा आहे. कला जोपासणारा माणूस कुणाला इम्प्रेस करण्यासाठी कला जोपासत नाही; तर त्यातून स्वतःला आनंद मिळतो म्हणून कलेत रमतो. मला तो आनंद गायन आणि संगीतामधून मिळतो. रोज रियाज करण्याचा प्रयत्न करतो. रियाज केला नाही, तर त्याचा परिणामही दिसून येतो. रियाजाला पर्याय नाही. मेहनतीशिवाय यशाचा दुसरा मार्ग नाही.

मृणाल जैन म्हणाल्या, आज-काल च्या जगात एखादा युवक रील बघण्याऐवजी रियाज करत असेल तर त्याचा सन्मान व्हायलाच हवा. म्हणून कलेच्या प्रामाणिकतेचा हा सन्मान आहे.

सुरेश शेठ यांनी संस्थेच्या उपक्रमाची माहिती दिली. प्राजक्ता वेदपाठक यांनी सूत्रसंचालन केले. वैष्णवी पाटणकर यांनी आभार प्रदर्शन केले.

## बँकॉक-दुबई प्रवाशांना थर्मल स्क्रीनिंग बंधनकारक

पुणे (दै. संध्या)

जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) 'इबोला' विषाणू संसर्गास 'आंतरराष्ट्रीय आरोग्य आणीबाणी' घोषित केल्यानंतर पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या सूचनेनुसार, विमानतळ आरोग्य संस्था आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण यांनी पुणे विमानतळावर कडक तपासणी व पूर्वतयारी उपाययोजना लागू केल्या आहेत. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सध्या एकही संशयित किंवा बाधित रुग्ण आढळलेला नाही. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासन आणि आरोग्य यंत्रणा पूर्णपणे सज्ज केली आहे. बँकॉक आणि दुबई या दोन शहरांत इबोला विषाणू मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यामुळे या दोन्ही देशांतून येणाऱ्या प्रवाशांची पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर थर्मल स्क्रीनिंग अनिवार्य करण्यात आली आहे. सर्व प्रवाशांना उतरण्यापूर्वी विमानातच 'सेल्फ डिक्लेरेशन फॉर्म' (स्वयं-घोषणापत्र) भरावा लागेल. यामध्ये त्यांच्या प्रवासाची आणि आरोग्याची माहिती देणे आवश्यक आहे. स्क्रीनिंगदरम्यान संशयित आढळणाऱ्या किंवा लक्षणे असणाऱ्या रुग्णांना उपचारासाठी नायडू रुग्णालयातील विशेष कक्षात दाखल केले जाणार आहे. विमानतळ आरोग्य अधिकारी, विमानतळ प्राधिकरणाकडून इमिग्रेशन, कस्टम्स आणि एअरलाईन ऑपरेटरच्या सर्व कर्मचाऱ्यांना पीपीई किट वापरणे, तपासणी करणे आणि संशयित रुग्णांना हाताळण्याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

## मतदार याद्या अधिक पारदर्शक; विशेष सखोल पुनरिक्षणाला सुरुवात

### जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी



पुणे (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात विशेष सखोल मतदार पुनरिक्षण (एसआयआर) मोहीम राबविण्यात येणार असून सुमारे ९१ लाख १६ हजार ३२५ मतदारांच्या नोंदींची घरोघरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे, मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

या मोहिमेंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्ज वाटप करतील व भरलेले अर्ज परत घेतील. घराघरात भेट देऊन पूर्वमुद्रित फॉर्म द्वारे मतदारांची माहिती पडताळणार आहेत. नाव, पत्ता, फोटो किंवा इतर तपशीलांमध्ये बदल असल्यास त्याची नोंद करता येणार आहे. तसेच अब्सेंट, शिफ्टेड, डेड आणि डुप्लीकेट (एएसडीडी) प्रकारातील नोंदींची तपासणीही केली जाणार आहे. २००२ ते २००४ मधील जुन्या मतदार याद्यांशी मॅपिंग उपलब्ध असल्यास अतिरिक्त कागदपत्रांची आवश्यकता भासणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

मोहीमेचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले असून २० ते २९ जूनदरम्यान गणना अर्जांची छपाई तसेच बीएलओ यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. ३० जून ते २९ जुलै २०२६ मतदारांच्या घरी बीएलओ प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्ज वाटप करतील व भरलेले अर्ज परत घेतील.५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल, तर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरदरम्यान दावे व हरकती नोंदवता येणार आहेत. ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दावे व हरकती निकालात काढणे. ७ ऑक्टोबर २०२६ ला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

जिल्ह्यातील सुमारे ८ हजार ४१७ बीएलओ आणि विविध राजकीय पक्षांचे ४ हजार ५५७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए)या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने राबविली जाईल तसेच कोणत्याही पात्र मतदाराचे नाव वगळले जाणार नाही, अशी ग्वाही श्री. डुडी यांनी यावेळी दिली.

## व्यापारी एकतेचा उत्सव : व्यापार भूषणसह विविध मानाचे पुरस्कार जाहीर

### व्यापारी एकता दिनानिमित्त पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन ; विनय सहस्त्रबुद्धे, अनास्कर यांची प्रमुख उपस्थिती




पुणे (दै. संध्या)

शहरातील व्यापारी क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना गौरविण्यासाठी स्टेशनरी, कटलरी एंड जनरल मर्चेंट असोसिएशनच्या वतीने वार्षिक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. व्यापारी एकता दिनानिमित्त सोमवार, दि. १ जून २०२६ रोजी सायं. ५.३० वा. नविपेठ येथील एस. एम. जोशी सभागृहात हा दिमाखदार कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार विनय सहस्रबुद्धे तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ बँकिंग तज्ञ विद्याधर अनास्कर उपस्थित राहणार असल्याची माहिती अध्यक्ष संजय राठी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला उपाध्यक्ष नितीन पंडित, सचिव किशोर चांडक, खजिनदार सुनील शिंगवी तसेच सूर्यकांत पाठक, अरविंद पटवर्धन, मदनसिंह राजपूत, राजेश गांधी, सुरेश नेरगावकर, सचिन जोशी, मोहन साखरिया, किशोर पिरगल, अनिल प्रभुने, मनीष परदेशी, किरण चौहान, अविनाश मुजुमदार, धनंजय रामलिंगे, सागर काकडे, सुमित कुडचे आदी मान्यवर उपस्थित होते.

असोसिएशनतर्फे देण्यात येणारा व्यापारी भूषण पुरस्कार यंदा विकी पॉलिमर्स प्रा. लि. चे दिलीप कुंभोजकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. व्यापारी भूषण पुरस्काराचे स्वरूप पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे आहे. तसेच सर्वोत्तम दुकान पुरस्कार जयश्री ग्रोसरी अँड ड्रायफ्रूट्सचे श्याम अग्रवाल, उत्कृष्ट विक्रेता कामगिरी पुरस्कार अरुणकुमार आणि कंपनीचे सचिन चांडक, कै. डॉ. धनंजय व साधनाताई गोरे स्मृती पुरस्कार बाजीराव रस्त्यावरील आशा मेहता, उत्कृष्ट महिला व्यापारी पुरस्कार तुळशीबागेतील सुवर्ण कलाकार स्वाती आंबासनकर आणि फिनिक्स पुण्याचा अभिमान पुरस्कार दीपक केटरर्सचे दीपक आणि निखिल मालानी यांना प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारांचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, श्रीफळ असे असणार आहे.

हा पुरस्कार सोहळा यंदा २८ व्या वर्षात पदार्पण करत असून, दरवर्षी व्यापारी एकता दिनानिमित्त आयोजित केला जातो. व्यापारी क्षेत्रात कर्तृत्व, प्रगती व सामाजिक बांधिलकी जपणा?या उद्योजकांना या पुरस्कारांद्वारे गौरविण्यात येते. स्वच्छता, सादरीकरण, आधुनिकता व ग्राहकांशी असलेले संबंध या निकषांवर निवड करण्यात येते.

यापूर्वी विश्वास जोशी (गिरीकंद ट्रॅव्हल्स), खिमजी गाला (गुडलक सेल्स डेपो), थ्रिटी पूनावाला व फरेशिद पटेल (दोराबजी अँड कंपनी), प्रदीप मराठे (कॉटन किंग), सूर्यकांत पाठक (ग्राहक पेठ), फतेचंद रांका (रांका ज्वेलर्स), कृष्णचंद्रजी आर्य (सुदर्शन स्टेशनरी), बाबुशेठ डाटा (लक्ष्मीनारायण चिवडा), चकोर गांधी (जव्हार ट्रेडिंग), राजेश शाह (जयराज ग्रुप), सचिन मालपाणी (बेकलाईट कंपनी), कृष्णकुमार गोयल (कोहिनूर ग्रुप) व राजेंद्र बांठिया आदींना व्यापारी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## ६ बांगलादेशी महिला बुधवार पेठेतून ताब्यात

पुणे (दै. संध्या)

■ ब्युटी पार्लर व घरकामाच्या आमिषाने भारतात आणल्याची कबुली



बुधवार पेठ परिसरात रविवारी रात्री राबवण्यात आलेल्या विशेष कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान फरासखाना आणि खडक पोलिस ठाण्याच्या पथकाने संयुक्त कारवाई करत बुधवार पेठ परिसरातील सागर बिल्डिंगवर छापा टाकला. या कारवाईत भारतात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या ६ बांगलादेशीमहिलांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याविरोधात पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई परिमंडळ १चे उपायुक्त कृषिकेश रावले यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार करण्यात आली. चौकशीत संबंधित महिलांनी सुरुवातीला ब्युटी पार्लर, शिलाईकाम किंवा घरगुती काम मिळवून देण्याचे आमिष दाखवून भारतात आणल्याचे सांगितले. मात्र, बुधवार पेठेत आल्यानंतर त्यांनी स्वेच्छेने वेश्याव्यवसाय सुरू केल्याची माहिती तपासात समोर आली आहे. या महिलांना भारतात कोणी आणले, त्यांनी सीमारेषा कशा ओलांडल्या, तसेच प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे कशी मिळवली, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. दरम्यान, परिमंडळ १चे उपायुक्त कृषिकेश रावले यांनी पदभार स्वीकारल्यानंतर बेकायदा बांगलादेशी नागरिकांविरोधातील कारवाईचा आकडा शंभरी पार गेला असून, आतापर्यंत १०३ जणांना पकडून त्यांची हकालपट्टी करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# जैन युवा क्रिकेट लीग २०२६ चा शानदार समारोप

पुणे (दै. संध्या)




जय जिनेंद्र प्रतिष्ठान (नजुश्री) गंगा धाम चौक येथे आयोजित जैन युवा क्रिकेट लीग २०२६ चा भव्य समारोप आणि बक्षीस वितरण सोहळा उत्साह, खिलाडूवृत्ती आणि सन्माननीय वातावरणात संपन्न झाला. या क्रिकेट महोत्सवात एकूण २४ संघांनी भाग घेतला होता, ज्यात १६ पुरुष आणि ८ महिला संघांनी आपले कौशल्य दाखवले.

महिलांच्या गटात, लोढा इव्हेंट चॅम्पियन्स आणि नकोडा थंडर यांच्यात सामना झाला. प्रथम फलंदाजी करताना, लोढा इव्हेंट चॅम्पियन्सने ८ षटकांत २ गडी गमावून १११ धावा केल्या. प्रत्युत्तरात, नकोडा थंडर ८ षटकांत ५ गडी गमावून केवळ ६९ धावाच करू शकली, ज्यामुळे लोढा इव्हेंट चॅम्पियन्स दणदणीत विजय मिळाला.

महिलांच्या गटात, रिती परमारला तिच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सामनावीर, सर्वोत्कृष्ट फलंदाज आणि सर्वोत्कृष्ट गोलंदाज पुरस्कार मिळाले. ऋषी बागरेचा ला सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. खिलाडूवृत्तीचा एक उल्लेखनीय आदर्श ठेवत, कर्णधार रितू परमारने आपला सर्वोत्कृष्ट फलंदाज पुरस्कार देशना ओसवालला आणि सर्वोत्कृष्ट गोलंदाज पुरस्कार रिनाल बांबला समर्पित केला. उपविजेत्या नाकोडा थंडर संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघमालक नीना ओसवाल यांनी खेळाडूंना प्रोत्साहन दिले आणि पुढील वर्षी आणखी चांगली कामगिरी करण्याचे वचन दिले. विजयी संघाचे मालक जितेश लोढा संघाच्या यशाने खूप आनंदित झाले होते.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात अरिहंत स्ट्रायकर्स आणि 1XL यांच्यात एक रोमांचक लढत पाहायला मिळाली. प्रथम फलंदाजी करताना, 1XL संघ ७.४ षटकांत ४६ धावांवर सर्वबाद झाला. लक्ष्याचा पाठलाग करताना, अरिहंत स्ट्रायकर्सने ५.४ षटकांत १ गडी गमावून ४७ धावा करत सामना जिंकला.

पुरुषांच्या गटात, सिद्ध जोधावतला सामनावीर, अगम शाहला सर्वोत्कृष्ट फलंदाज आणि मालिकावीर, चेतन जैनला सर्वोत्कृष्ट गोलंदाज आणि जय ओसवालला सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून गौरविण्यात आले.

सर्व पुरस्कार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि प्रायोजक, नरेशजी राठोड आणि सुनीताजी राठोड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. चषक संतोष ग्रुपचे संतोषजी जैन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आणि नाणेफेक जयराज ग्रुपचे राजेशजी शाह यांच्या हस्ते पार पडली. आयोजकांचे प्रमुख, अचल जैन यांनी सर्व खेळाडू, प्रायोजक आणि भागीदारांचे आभार मानले. हरेश शाह यांनी घोषणा केली की, तरुणांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या आणि समाजाला जोडण्याच्या उद्देशाने ही क्रिकेट लीग भविष्यात दरवर्षी आयोजित केली जाईल. विजेत्या अरिहंत स्ट्रायकर्स संघाचे मालक मयूर जैन यांना ट्रॉफी जिंकल्याचा आनंद झाला, तर 1XL संघाचे मालक धीरज जैन यांनी पुण्याबाहेर असूनही फोनवरून आपल्या संघाचे उपविजेतेपदाबद्दल अभिनंदन केले.

त्यांनी प्रमुख योगदानकर्ते विजय राठोड, दिशांक जैन, ललित ओसवाल, धीरज जैन, भादेश बाफना, सनी जैन आणि उत्तम जैन यांचे आभार मानले आणि त्यांना आपला सहभाग सुरू ठेवण्याचे आवाहन केले. १५ सदस्यीय संघाच्या जवळपास महिनाभराच्या अथक प्रयत्नांनंतर आणि कठोर परिश्रमानंतर हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. नरेश राठोड यांनी समीर जैन, नितीन जैन, गौरव ओसवाल, शैलेश छाजेड, धीरज शाह, गौतम छाजेड, ललित ओसवाल, कुणाल गांधी, हर्षद ओसवाल, मयूर ओसवाल, जितेंद्र जैन, पंकज धुमावत आणि अमित जैन यांच्या यशस्वी आयोजन आणि संचालन संघाचे विशेष आभार मानले. युवकांचा सहभाग आणि परस्पर सामंजस्य वाढवण्यासाठी महासंघ पुणे भविष्यात असे अनेक कार्यक्रम आयोजित करेल.

# शिवसेनेचा पुणे महानगरपालिकेवर आक्रमक हल्लाबोल मोर्चा

## ■ संतप्त शिवसैनिक थेट पुणे महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर चढले, महापालिकेत शिरून प्रशासनाला विचारला जाब ■

**पुणे (दै. संध्या) :**




पहिल्याच पावसात पुणे शहरातील रस्ते, चौक, नाले आणि ड्रेनेज व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने आज पुणे महानगरपालिकेवर अत्यंत आक्रमक पद्धतीचे हल्लाबोल आंदोलन करण्यात आले. शेकडो शिवसैनिक पुणे महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर एकत्र येत जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. “ड्रेनेज व्यवस्था दुरुस्त करा नाहीतर पुणेकरांना होड्या वाटा”, “पुणेकरांना पावसात बुडवणाऱ्या प्रशासनाचा निषेध असो” अशा संतप्त घोषणांनी परिसर दणाणून गेला. शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांच्या नेतृत्वात संतप्त शिवसैनिकांनी थेट पुणे महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर चढत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

यावेळी बोलताना शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी पुणे महानगरपालिका प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला. “महानगरपालिकेने हजारो कोटींच्या निविदा काढल्या, वर्तमानपत्रांत जाहिराती दिल्या, मात्र प्रत्यक्षात एकही काम वेळेत आणि दर्जेदार झालेले नाही. अवघ्या अर्ध्या तासाच्या पावसात संपूर्ण पुणे शहर पाण्यात बुडाले. सामान्य पुणेकरांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. रस्ते, चौक आणि वस्त्या जलमय झाल्या. हा हजारो कोटींचा मलिदा कोणी खाल्ला याचा जाब आता पुणेकर विचारणार आहेत,” असा इशारा त्यांनी दिला. “पुणेकरांच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि सत्ताधाऱ्यांना शिवसेना जाब विचारल्याशिवाय राहणार नाही,” असेही ते म्हणाले.

पहिल्याच मुसळधार पावसात पुणे शहरातील अनेक भाग जलमय झाल्याने सर्वसामान्य पुणेकरांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले, वाहतूक विस्कळीत झाली, अनेक ठिकाणी घरांमध्ये आणि दुकानांमध्ये पाणी शिरले, तर शहरातील ड्रेनेज व्यवस्था पूर्णपणे निकामी झाल्याचे चित्र दिसून आले. पावसाळ्यापूर्व कामांवर हजारो कोटींच्या निविदा काढल्याचा दावा करणाऱ्या पुणे महानगरपालिकेचा भोंगळ आणि गलथान कारभार पहिल्याच पावसात उघड झाल्याचा आरोप शिवसेनेने केला. “शेकडो कोटींचा निधी गेला कुठे?”, “पुणेकरांचा पैसा खाल्ला कोणी?” असा सवाल करत शिवसैनिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र रोष व्यक्त केला.

आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी अनोख्या आणि लक्षवेधी पद्धतीने महानगरपालिकेचा निषेध नोंदवला. पुणे शहरातील आठ विधानसभा मतदारसंघांमध्ये फिरण्यासाठी महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना शिवसेनेच्या वतीने प्रतीकात्मक होड्या भेट देण्यात आल्या. याचवेळी आंदोलक शिवसैनिकांना प्रवेशद्वारावर रोखण्यात आल्यानंतर अनेक शिवसैनिक अधिक संतप्त झाले आणि त्यांनी थेट प्रवेशद्वारावर चढून आंदोलन तीव्र केले.

काही शिवसैनिकांनी महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावरून आत शिरत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली. यामुळे काही काळ परिसरात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या आंदोलनातील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो म्हणजे शिवसैनिकांनी अंगावर घेतलेली जलपर्णी. मुळा-मुठा नदीत वाढलेल्या जलपर्णीच्या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसैनिकांनी थेट अंगावर जलपर्णी घेत “मी पुण्यातली जलपर्णी... मला कधी काढणार?” अशा घोषणाबाजी करत प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध केला. नदी स्वच्छतेच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा खर्च दाखवला जात असताना प्रत्यक्षात नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर जलपर्णी वाढल्याचे चित्र असल्याने शिवसेनेने प्रशासनाला लक्ष्य केले. या अनोख्या आंदोलनामुळे परिसरातील नागरिक आणि माध्यमांचे विशेष लक्ष वेधले गेले.

पावसाळ्यापूर्व कामे पूर्ण करण्यात झालेल्या हलगर्जीपणाविरोधात शिवसेना आणखी तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. सर्वसामान्य पुणेकरांना मूलभूत सुविधा मिळवून देण्यासाठी शिवसेना कटिबद्ध असून, शहराला पाण्यात बुडवणाऱ्या प्रशासनाविरोधात रस्त्यावर उतरून संघर्ष सुरूच ठेवला जाईल, असा निर्धार शिवसैनिकांनी व्यक्त केला.

या आंदोलनाला शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अमर घुले, माजी नगरसेविका सोनाली लांडगे, पंकज कोद्रे,विकी माने, अभिजित बोराटे, आनंद गोयल,मिलिंद अहिरे, दत्ता खवळे, नितीन पवार, सुधीर कुरुमकर, राजाभाऊ भिलारे, नवनाथ निवंगुणे, प्रकाश ढमढेरे, दीपक कुलाळ, प्रवीण हिलगे, तुषार मरळ, अक्षय टकले, महेंद्र जोशी, अनिकेत सपकाळ,संतोष लांडगे,अक्षय तारू, सचिन तरवडे,एकनाथ ढोले, अनिल दामजी, संदेश पावसकर, लक्ष्मण कामलेकर, स्मिता साबळे, विशाल सरोदे, अजित ढोकळे,रोहित कदम, अश्विनी मल्हारी,हेमंत बत्ते, स्वराज बाबर, प्रशांत मते, प्रणव धंगेकर, आकाश रेणूसे, मार्तंडराज धंधुके, उमेश गालींदे, अमित दाभाडे,अकबर शेख, सुहास कांबळे, श्याम ताठे, उद्धव कांबळे, राजू परदेशी, श्रीधर कामठे, मंगेश सातपुते,तुषार सातपुते, आशिष कामठे, सोनू रणपिसे श्रीराम चौक जेष्ठ नागरिक, शिवसेना पुणे शहरातील पुणे शहरातील सर्व प्रमुख पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## थोडक्यात पण महत्वाचे...




### भगवान मेदनकर यांचा निर्माता विभागातून उमेदवारी अर्ज दाखल

चाकण (दैनिक संध्या) : चाकण येथील नाट्य व चित्रपट निर्माते भगवान निवृत्ती मेदनकर यांनी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या कार्यकारी मंडळ पंचवार्षिक निवडणूक सन २०२६ ते २०३२ या कालावधीसाठी निर्माता विभागातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी रागिनी खेडकर यांनी मेदनकर यांचा उमेदवारी अर्ज स्वीकारला आहे. भगवान मेदनकर यांनी गेल्या वीस वर्षांपासून कला क्षेत्राला वाहून घेतले आहे. मराठी चित्रपट सृष्टीतील नवोदित कलाकार, निर्माते व ग्रामीण प्रतिभावंतांना खुले व्यासपीठ मिळावे, त्यांच्या समस्या शासन आणि महामंडळापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी मेदनकर हे निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. माहेर माझं, हम गया नही जिंदा हूं व कॉलेजियन्स या चित्रपटांची त्यांनी अथक परिश्रमातून निर्मिती केली आहे. पळा पळा कोण पुढे पळे या नाटकाची निर्मिती करताना मेदनकर यांनी मनोरंजना सोबत, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांना प्रचंड प्राधान्य दिले आहे. शिवाजी अंडर ग्राउंड इन भीमनगर मोहल्ला या गाजलेल्या व अजरामर ठरलेल्या नाटकाच्या निर्मितीतही मेदनकर यांचा सिंहाचा वाटा आहे. भगवान मेदनकर यांनी स्वतःची अशी छाप उमटवली आहे. गोंधळ व घर बंदूक बिर्याणी या मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी बहूरंगी भूमिका साकारल्या. नागराज मंजुळे यांच्या घर बंदूक बिर्याणी या चित्रपटात भगवान यांची आमदाराची भूमिका प्रचंड गाजली.

### नशेच्या इंजेक्शनची बेकायदा विक्री उघड; सराईत गुन्हेगार अभिषेक भडंगे अटक

पुणे (दैनिक संध्या) : बॉडी बिल्डिंग आणि नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रतिबंधक औषधांची (इंजेक्शन्स) बेकायदेशीरपणे विक्री करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी हडपसर परिसरातून अटक केली. अभिषेक खंडू भडंगे (वय २५, रा. हिंगणे मळा, हडपसर, पुणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर यापूर्वी हडपसर पोलिस ठाण्यात ११ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरात २४ मे रोजी पहाटेपर्यंत गुन्हे शाखेकडून कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. त्यावेळी आरोपी अभिषेक भडंगे हा हिंगणे मळा येथील आकाश डांग माळी यांच्या खोलीत भाड्याने राहतो. तो तेथून नशेसाठी वापरले जाणारे ‘मेफेनटरमाइन सल्फेट’ हे प्रतिबंधक इंजेक्शन विनापरवाना विकत असल्याची माहिती युनिट सातचे सहाय्यक निरीक्षक मदन कांबळे आणि खंडणी विरोधी पथक- दोनचे पोलिस निरीक्षक राम राजमाने, पोलिस अंमलदार नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, किरण पड्याळ यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याठिकाणी छापा टाकला. पोलिसांची चाहुल लागताच आरोपी अभिषेकने तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्याला पाठलाग करून पकडले. त्याच्या खोलीतून प्रतिबंधक इंजेक्शनच्या ८२ बाटल्या मिळून आल्या.

---

## ‘वसुधा’ची टीआरपीमध्ये हॅट्रिक; झी टीव्हीच्या मालिकांचा प्रेक्षकांवर कायम दबदबा

**पुणे (दै. संध्या) :**

हिंदी मनोरंजन वाहिन्यांच्या स्पर्धेत झी टीव्हीने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले असून ‘वसुधा’ मालिकेने सलग तिसऱ्या आठवड्यात टीआरपी चार्टमध्ये क्रमांक 1 चे स्थान कायम राखत हॅट्रिक साधली आहे. भावनिक कथानक, कौटुंबिक नात्यांची गुंतागुंत आणि प्रेक्षकांच्या मनाला भिडणाऱ्या व्यक्तिरेखा यामुळे या मालिकेने देशभरातील प्रेक्षकांची पसंती मिळवली आहे. त्यामुळे ‘वसुधा’ ही सध्या हिंदी टेलिव्हिजनवरील सर्वाधिक चर्चेत असलेल्या फिक्शन मालिकांपैकी एक ठरली आहे. झी टीव्हीच्या इतर मालिकांनाही प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. ‘गंगा माई की बेटियाँ’ या मालिकेला 1.8 असा प्रभावी टीवीआर मिळाला



असून भावनिक आणि कौटुंबिक कथांबद्दल प्रेक्षकांचा वाढता कल पुन्हा अधोरेखित झाला आहे. तसेच ‘तुम से तुम तक’ या मालिकेनेही 1.6 टीवीआरसह आपली लोकप्रियता टिकवून ठेवली आहे. आर्यवर्धन आणि अनु यांच्या नात्यातील भावनिक चढ-उतार पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असल्याचे चित्र दिसून येत आहे. या तिन्ही मालिकांमुळे झी टीव्हीचे फिक्शन मनोरंजन क्षेत्रातील स्थान अधिक मजबूत झाले आहे.

---

## सिग्निफायचा देशभर विस्तार; फिलिप्स स्मार्ट प्रकाश केंद्रांची संख्या ३४५ वर

**पुणे (दै. संध्या) :**

जागतिक प्रकाशयोजना क्षेत्रातील आघाडीची कंपनी सिग्निफायने भारतभर आपल्या फिलिप्स स्मार्ट प्रकाश केंद्र जाळ्याचा विस्तार करत देशातील उपस्थिती ३४५ दुकानांपर्यंत वाढवली आहे. स्मार्ट आणि जोडलेल्या घरगुती सुविधांकडे ग्राहकांचा वाढता कल लक्षात घेऊन कंपनीने हा विस्तार हाती घेतला आहे.

मे महिन्यात कंपनीकडून तब्बल १५ नवीन स्मार्ट प्रकाश केंद्रे सुरू करण्यात येत असून, त्यामध्ये नोएडा, दिल्ली, सोनीपत, बेंगळुरू, हैदराबाद, चेन्नई, रायपूर, बरेली, सोलन, विजयवाडा आणि मध्यमग्रामसह विविध शहरांचा समावेश आहे. या माध्यमातून सिग्निफायने अनुभवाधारित आणि आकर्षक रचनांवर




आधारित प्रकाशयोजना विक्रीला अधिक चालना दिली आहे.

कंपनीच्या मते, नवीन स्मार्ट प्रकाश केंद्रांमध्ये ग्राहकांना सजावटी, उपयुक्त आणि स्मार्ट प्रकाशयोजना उपायांचा विस्तृत अनुभव घेता येणार आहे. आधुनिक गृहसजावट, वैयक्तिक पसंती आणि ऊर्जा बचतीवर भर देणाऱ्या ग्राहकांसाठी ही केंद्रे विकसित करण्यात आली आहेत.

या विस्ताराबाबत प्रतिक्रिया देताना सिग्निफाय ग्रेटर इंडियाचे ग्राहक व्यवसाय प्रमुख सी. अरुण कुमार म्हणाले, “भारतीय ग्राहक आता प्रकाशयोजनेकडे केवळ गरज म्हणून नव्हे, तर जीवनशैली आणि घराच्या सजावटीचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहत आहेत. आकर्षक, आधुनिक आणि अनुभव समृद्ध करणाऱ्या प्रकाशयोजना उपायांची मागणी झपाट्याने वाढत आहे. जवळपास दर दोन दिवसांनी नवीन स्मार्ट प्रकाश केंद्र सुरू होत असल्यामुळे भारतातील आधुनिक घरगुती अनुभवांची वाढती मागणी स्पष्ट होत आहे.”

ते पुढे म्हणाले, “या केंद्रांच्या माध्यमातून ग्राहकांना तंत्रज्ञान, रचना आणि वैयक्तिक पसंती यांचा संगम अनुभवता येईल. नव्या पिढीतील गृहस्वाम्यांशी आमचा संबंध अधिक दृढ करण्यासाठी हा विस्तार महत्त्वाचा टप्पा ठरेल.”

फिलिप्स स्मार्ट प्रकाश केंद्र संकल्पनेद्वारे ग्राहकांना प्रत्यक्ष अनुभवातून विविध प्रकाशयोजना पर्याय समजून घेण्याची संधी मिळणार असून, पुढील काळात अनुभवाधारित विक्री विस्तारावर कंपनीचा अधिक भर राहणार असल्याचे संकेत सिग्निफायकडून देण्यात आले आहेत.

---

## मुंबई-पुणे हायवे लगतच्या सर्विस रोडवरील अतिक्रमणे हटवा

### नगरसेविका श्रुती वाकडकर यांची आयुक्तांकडे मागणी

**पिंपरी-चिंचवड (दै. संध्या) :**

प्रभाग क्र. २५ मधील सूर्या हॉस्पिटल ते पुनावळे हद्द या परिसरातील मुंबई–पुणे हायवे लगतच्या सर्विस रोडच्या दोन्ही बाजूस महानगरपालिका हद्दीतील १२ मीटर रुंद रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अनधिकृत टपऱ्या, लाकडी शेड तसेच इतर बेकायदेशीर बांधकामे उभारण्यात आली असल्याबाबत नगरसेविका श्रुती राम वाकडकर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

या अनधिकृत टपऱ्या आणि बांधकामांमुळे फुटपाथ अडवला गेला असून पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून वाहतुकीलाही मोठा अडथळा निर्माण होत आहे. सकाळ आणि संध्याकाळच्या वेळेत या परिसरात



मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून सातत्याने होत आहे.

याशिवाय या टपऱ्यांमुळे परिसरात अस्वच्छता वाढत असून काही ठिकाणी अनधिकृत वीज जोडण्यांचाही धोका निर्माण झाला आहे. सार्वजनिक सुरक्षितता आणि नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने ही बाब अत्यंत गंभीर असल्याने प्रशासनाने तातडीने दखल घेणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नगरसेविका श्रुती वाकडकर यांनी महानगरपालिका प्रशासनास सदर ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अनधिकृत टपऱ्या व बांधकामांवर तात्काळ अतिक्रमण हटाव कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच रस्ता व फुटपाथ नागरिक आणि पादचाऱ्यांसाठी मोकळा करून देण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक सुरळीत होण्यासाठी प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी

---

## पेट्रोल-डिझेल दरवाढ ही फक्त सुरुवात पिक्चर अभी बाकी है

**मुंबई (दै. संध्या) :**

पेट्रोल डिझेलच्या दरवाढीबाबत काही आश्चर्य वाटत नाही. ही फक्त सुरूवात आहे, पिक्चर अभी बाकी है कशाचेही सोंग घेता येते हो पण पैसे आणि अन्नधान्याचे सोंग घेता येत नाही.असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी मुंबई येथे प्रसार माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.मुंबईमध्ये पेट्रोल पंप बंद पडत असल्याच्या प्रश्नावर बोलताना सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की, मला अजिबातच आश्चर्य वाटत नाही. मागच्याच आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांचे वेगवेगळी विधाने आहेत. फडणवीस यांनी म्हटले की, काही काळजी करू नका आपल्याकडे पेट्रोल डिझेल आहे, आम्ही विश्वास ठेवला. भुजबळ

**■ पेट्रोल पंप बंद, महागाई वाढली, सरकार खरं का बोलत नाही?**

म्हणाले की, 30 दिवसाचा साठा आहे, काटकसरीपणे वापरा. याचा काय अर्थ काढायचा. काय नियोजन केले? राहुल गांधी गेल्या सहा महिन्यांपासून या गोष्टी मांडत आहेत. काय करतंय सरकार? याबाबतीत सरकार का खरे बोलत नाही,असे सुप्रिया सुळे यांनी बोलताना सांगितले आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, महागाई, भ्रष्टाचार आणि बेरोजगारी याबाबत आम्ही सविस्तर चर्चा करणार आहोत. इलेक्शन काय येतील आणि जातील. पण जो सामान्य माणूस आहे, जो टॅक्स भरत आहे, त्याने कसे जगाचे? घरी जाऊन भाज्यांचे भाव विचारा एकीकडे कांद्याला भाव शेतकऱ्यांना मिळत नाही आणि जो ग्राहक आहे. त्याला तो परवडत नाही, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

---

# अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना व्यवहारिक मराठीचे धडे; संघटनांनी पुढाकार घ्यावा

**१५ ऑगस्टनंतर मुदतवाढ नाही — परिवहन मंत्री प्रताप सरनाईक**

**मुंबई (दै. संध्या) :**

राज्यातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा सहज बोलता, समजता आणि दैनंदिन व्यवहारात प्रभावीपणे वापरता यावी यासाठी परिवहन विभागामार्फत व्यापक मराठी शिक्षण अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. या उपक्रमात रिक्षा-टॅक्सी संघटनांनी सक्रिय सहभाग घेऊन पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष बैठकीत राज्यातील विविध रिक्षा व टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी मराठी भाषा शिक्षण उपक्रमाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, चालकांना व्यवहारिक मराठी आत्मसात करता यावी यासाठी दररोज चार तासांचे ऑफलाइन प्रशिक्षण दिले जाणार आहे. मराठी संभाषण कौशल्य विकसित करण्यावर विशेष भर





देण्यात येणार असून ऑनलाइन प्रशिक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रशिक्षण अधिक प्रभावी आणि सुलभ व्हावे यासाठी विविध शाखा कार्यालयांमध्ये विशेष वर्ग आयोजित करण्यात येणार आहेत. मुंबई, ठाणे, डोंबिवली, नवी मुंबई, वसई-विरार, पालघर आणि डहाणू या भागांत प्रारंभी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. तसेच कोकण मराठी साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातूनही मराठी शिकविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी सुमारे ४५०० शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यांना मानधन दिले जाणार आहे. शासनाकडून यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आल्याची माहितीही मंत्री श्री. सरनाईक यांनी दिली. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर चालकांची मौखिक परीक्षा घेण्यात येणार असून यशस्वी उमेदवारांना शासनाकडून अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय हिंदी ते मराठी भाषांतर आणि सोपे मराठी संभाषण शिकण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित ऑनलाइन ॲपची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या ॲपच्या माध्यमातून चालकांना मराठी शब्द, वाक्यरचना आणि दैनंदिन संवाद सहज शिकता येणार असून मराठी भाषेचा वापर अधिक सुलभ होणार आहे.

या उपक्रमामुळे प्रवासी आणि चालक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होण्यास मदत होईल तसेच मराठी भाषेचा प्रसार आणि वापर मोठ्या प्रमाणात वाढेल, असा विश्वास मंत्री श्री. सरनाईक यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### भारत मुक्ती मोर्चाच्या राज्य कार्यकारणी सदस्यपदी ॲड. सुशिल अहिवळे



बारामती (दैनिक संध्या) : भारत मुक्ती मोर्चा या राष्ट्रव्यापी संघटनेच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्यपदी बारामती येथील ॲड.सुशिल भारत अहिवळे यांची निवड करण्यात आली आहे. बामसेफ,भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष सचिन बनसोडे यांनी हि निवड केली आहे. भारत मुक्ती मोर्चा हि देशातील बहुजनांची सर्वात मोठी सामाजिक संघटना असून आगामी काळात या संघटनेच्या माध्यमातून शिव-फुले-शाहू-आंबेडकरांची आणि बहुजन महापुरुषांची समतेची विचारधारा अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करणार असून सोबतच भारत मुक्ती मोर्चा सातत्याने ज्या विषयांवर आवाज उठवत आली आहे.असे ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा मुद्दा आणि ईव्हीएम विरोधातील आंदोलन यांसारखे अन्य ज्वलंत मुद्दे लोकांपर्यंत घेऊन जाऊन हि जनआंदोलने अधिक तीव्र करणार असल्याचे या निवडीनंतर ॲड.अहिवळे यांनी सांगितले.दरम्यान याआधी ॲड.अहिवळे यांनी भारत मुक्ती मोर्चाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्ष आणि कार्याध्यक्ष पदी देखील काम केले आहे.

### तळेगाव ढमढेरे बाजारात बोकडाला 80 हजार रुपये बाजार भाव, विक्रमी आवक

तळेगाव ढमढेरे (दैनिक संध्या) : तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथील शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या महात्मा फुले उपबाजारात बकरी ईद मुळे आज झालेल्या बाजारात बोकडाला तब्बल ८०००० हजार रुपये बाजारभाव मिळाला असून, तीन हजाराच्या वर शेळी, बोकड व मेंढ्यांची विक्री झाली असल्याची माहिती प्रशासक हरिश्चंद्र कांबळे, सचिव अनिल ढोकले व सहाय्यक सचिव अनिल ढमढेरे यांनी दिली. बाजार समितीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी आजच्या भरलेल्या बाजाराचे उत्कृष्ट नियोजन केले. तळेगाव ढमढेरे येथील महात्मा फुले उपबाजार आवारात सोमवारी भरलेल्या बाजारात ३००० हजारचे वर शेळी, बोकड व मेंढ्यांची आवक झाली. बकरी ईद सणामुळे बोकडाला ३५००० हजार ते ८०००० असा विक्रमी बाजारभाव मिळाला आहे. शेळीला ८००० हजार ते २१००० हजार आणि मेंढीला ४००० पासून ते ९००० हजार रुपयांपर्यंत बाजार भाव मिळाला आहे. आजच्या बाजारात चांगला बाजार भाव मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. बाजार समितीने बाजारचे उत्कृष्ट नियोजन केले होते. वाहन पार्किंग व शेळी, बोकड व मेंढी विक्रीसाठी प्रशस्त जागा उपलब्ध करून दिली होती. पुणे, अहिल्यानगर, नाशिक, सातारा आणि बीड जिल्हा या विविध भागातून शेतकरी वर्ग आपले शेळी, बोकड व मेंढी विक्रीसाठी आले होते. तसेच अहिल्यानगर, पुणे, सातारा, अलिबाग, मुंबई, पनवेल, सोलापूर जिल्ह्यातील व्यापारी खरेदीसाठी आले होते.

### व्याजाच्या पैशांच्या तगाद्याला कंटाळून शेतकऱ्याने गळफास घेऊन जीवन संपविले

बारामती (दैनिक संध्या) : व्याजाच्या पैशांसाठी वारंवार तगादा लावून जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या त्रासाला कंटाळून धनेश गुंडीबा गोसावी (वय 40, रा. पारवडी, ता. बारामती) या शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पारवडी (ता. बारामती) येथे घडली. याप्रकरणी बारामती तालुका पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात रूपाली धनेश गोसावी (वय ३६, रा. पारवडी गोसावी वस्ती, ता. बारामती) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरुन सोनू उर्फ लखन यादव डावरे, जयश्री लखन यादव डावरे (दोघे रा. साठेनगर, इंदापूर) तसेच सतीश शहाजी लांडगे, मारुती हरीदास लांडगे आणि प्रितम उर्फ कावा लांडगे (रा. पारवडी, ता. बारामती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धनेश गोसावी यांच्याकडून घेतलेल्या पैशांवर मुद्दलापेक्षा अधिक रक्कम व व्याज दिले होते. तरीही आरोपी वारंवार त्यांच्या घरी जाऊन उर्वरित व्याज व दंडाच्या पैशांसाठी तगादा लावत होते. तसेच "पैसे दिले नाहीत तर जीवे मारू," अशी धमकी देत असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या मानसिक त्रासाला कंटाळून धनेश गोसावी यांनी शनिवारी (ता. 24) दुपारी पारवडी येथील शेतात लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी बारामती तालुका पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 108, 351 (2), 351 (3), 3 (5) तसेच सावकारी अधिनियम कलम 39 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक विक्रम पवार करीत आहेत.

### बकरी ईदपूर्वी बेल्हेच्या आठवडी शेळी बाजारात लाखोंची उलाढाल

बेल्हे (दैनिक संध्या) : बेल्हे (ता. जुन्नर) येथे (ता. २५) सोमवारच्या जनावरांच्या आठवडे शेळी बाजारात बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शेळ्या, मेंढ्या व बोकडांची मोठ्या प्रमाणावर आवक झाली होती. दरम्यान बकरी ईदसाठी विशेषतः बोकडांना मागणी असल्याने, शेळ्यांच्या बाजारात मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल झाली. बेल्हे येथे दर सोमवारी जनावरांचा मोठा बैल बाजार भरतो. तसेच जवळच शेळ्या - मेंढ्यांचाही बाजार भरतो. याठिकाणी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शेळ्या, मेंढ्या व बोकडांची सर्व मिळून जवळपास ३०० नग एवढी आवक झाल्याचे सांगण्यात आले.

# "सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?"

**सहसंपर्कप्रमुख पुणे जिल्हा दिलीपजी बाम्हणे**

जुन्नर (दै. संध्या)

■ जुन्नर तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत शिवसेनेचे तहसील कार्यालयावर निवेदन



जुन्नर तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या प्रचंड आर्थिक संकटातून जात असून कांद्याला मिळणाऱ्या अत्यल्प दरामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मा. तहसीलदार साहेब, जुन्नर यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यामध्ये कांद्याला तात्काळ हमीभाव जाहीर करणे, शासन खरेदी सुरू करणे, कांदा निर्यातीवरील निर्बंध हटविणे, प्रति क्विंटल अनुदान देणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत व कर्जमाफी जाहीर करणे तसेच शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी ठोस धोरण राबविण्याच्या प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेश भाऊ भोर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "शेतकरी हा देशाचा कणा असून आज त्याच शेतकऱ्याला आपल्या मालाला योग्य भाव मिळत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. शासनाने केवळ घोषणा न करता तात्काळ प्रत्यक्ष निर्णय घेणे गरजेचे आहे. कांदा उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त होत असताना शिवसेना स्वस्थ बसणार नाही. शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून तीव्र लढा उभारला जाईल."

तसेच शिवसेना तालुकाप्रमुख भास्कर शेठ गाडगे यांनी सांगितले की, "जुन्नर तालुक्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत सापडला आहे. उत्पादन खर्च वाढला असून बाजारात कांद्याला कवडीमोल दर मिळत आहेत. शासनाने तात्काळ शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही तर संतप्त शेतकऱ्यांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. भविष्यात निर्माण होणाऱ्या परिस्थितीस शासन आणि प्रशासन जबाबदार राहील."

यावेळी सहसंपर्कप्रमुख पुणे जिल्हा दिलीपजी बाम्हणे यांनी सरकारवर जोरदार टीका करताना सांगितले की, "आज कांदा उत्पादक शेतकरी रडत आहे आणि सरकार मात्र बघ्याची भूमिका घेत आहे. शेतकऱ्यांच्या घामाला भाव नाही, मेहनतीला किंमत नाही. सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? असा सवाल आता सामान्य शेतकरी विचारत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तात्काळ निर्णय घेतला नाही तर शिवसेना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही."

सदर निवेदनावेळी उपजिल्हाप्रमुख शरद चौधरी, सहसंपर्कप्रमुख दिलीप बाम्हणे, आनंद रासकर, बन्सी चतुर, राहुल सुकाळे, उत्तम काशीद, खंडू शिंदे, शहर प्रमुख मयूर रोकडे, शैलेश बनकर, अमोल बनकर, बाळासाहेब सदाकाळ, साईनाथ डोके, प्रसाद बनकर, युवासेनेचे शांताराम सावंत, महिला जिल्हा संघटिका ज्योत्स्नाताई महाबरे, उत्तम शेठ आहेर, जयराम शेठ तांबे, जिल्हा परिषद सदस्य गुलाब शेठ पारखे, पंचायत समिती उपसभापती अमित ढोले तसेच शिवसैनिक, पदाधिकारी व कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विकास लवांडे यांना जामीन न देण्याची पोलिसांची मागणी

पुणे (दै. संध्या)

वारकरी संप्रदायाविषयी वादग्रस्त व्यक्तव्य केल्याप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना जामीन देण्यास पुणे पोलिसांनी सोमवारी न्यायालयात विरोध केला. लवांडे तक्रारदार, साक्षीदारांवर दबाव टाकू शकतात; तसेच आषाढी एकादशीनिमित्त आगामी वारी सोहळ्याच्या काळात अशा वक्तव्याची पुनरावृत्ती झाल्यास कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी कारणे देत वाघोली पोलिसांनी लवांडेंचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची मागणी न्यायालयात केली.

वारकरी संप्रदायाबद्दल केलेल्या वक्तव्याप्रकरणी विकास सदाशिव लवांडे (वय ५१, रा. शिंदेवाडी, हवेली) यांना गुरुवारी (ता.२८) वाघोली पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १९६ (१) (ए) (दोन गटांत शत्रुत्व वाढवून एकोप्याला बाधा पोहोचविणे), २९९ (धार्मिक श्रद्धांचा अपमान), ३०२ (धार्मिक भावना दुखावणे) आदी कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत, नलिनी आशिष वायाळ (वय ४१, रा. येरवडा) यांनी तक्रार दिली आहे. या प्रकरणात येरवडा कारागृहात रवानगी झाल्यानंतर लवांडे यांनी ॲड. मिलिंद पवार यांच्यामार्फत जामीन मिळण्यासाठी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात अर्ज केला. त्यास वाघोली पोलिस आणि सरकारी वकिलांनी विरोध केला.

## शिरुरच्या बेट भागातील शेतीला वरदान ठरणाऱ्या मीना शाखा कालव्यास पाणी

कवठे येमाई (दै. संध्या)



शिरुरच्या बेट भागातील शेतीला वरदान ठरणाऱ्या मीना शाखा कालव्यास भर कडक उन्हाळ्यात १४ मे २०२६ रोजी आवर्तन सुरु झाल्याने त्याचा फायदा मीना कालवा कार्यक्षेत्रातील असणा-या गावातील शेतीला होणार असून कालव्यास गरजेच्या वेळी पाणी आल्याने शिरूरच्या बेट भागातील शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. कालव्यास दूसरे उन्हाळी आर्वतन सध्या सुरू असून त्याचा फायदा पिण्याच्या पाण्यासाठी व जनावरांच्या चा-यासाठी नक्कीच होणार आहे .

**शेतकऱ्यांमध्ये समाधान**

यावर्षी उन्हाळा तीव्र जाणवत असल्याने अनेक ठिकाणी बोरवेल व विहिरीने तळ गाठला होता. परंतु जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व विधानसभा सदस्य दिलीप वळसे पाटील,विधानसभा सदस्य शरद सोणवने यांच्याकडे घोड/कुकडी प्रकल्प कालवा सल्लागार सदस्य प्रकाश वायसे व शिष्टमंडळाणे सर्व शेतकरी व पाणी वापर संस्था यांच्या वतीने मागणी केली असता याबाबत कार्यकारी संचालक इंजि.हनुमंत धुमाळ,मुख्य अभियंता इंजि. संजय चोपडे,अधिक्षक अभियंता इंजि.अलका अहिरराव,कार्यकारी अभियंता गणेश नान्नोर,उपविधागीय अभियंता सचिन शिंदे यांच्याकडे पत्रव्यव्हार करण्यात आला होता.

या कालव्यावरील शिरोली,जाबुंत,टाकळी हाजी या तीन शाखा असुन २० गावांतील २३ पाणी वापर संस्थांचा समावेश आहे. १४ हजार ६९४ हेक्टर क्षेत्रावरील सर्व पिकांना सध्या सुरू झालेल्या आवर्तनाचा खूप च फायदा होणार आहे.

सध्या आवर्तन टाकळी हाजी येथे सुरु असुन संस्था कार्यक्षेत्रातील सर्व शेतक-यांनी पुढील काळात आपला पाणी मागणी अर्ज संबंधित संस्थेकडे भरुन द्यावा.प्रत्येकाने जागरूक राहुन पाण्यावरील आपला हक्क अबाधित ठेवावा, असे आवहन टाकळी शाखेतील आवर्तन सुरु असताना प्रकाश वायसे यांनी केले,यावेळी पहाणी करताना समवेत पा.वा.स.चेअरमन रखमा निचित, संपत पानमंद,शिवाजी वाळुंज,हिरामण बोराडे,उत्तम निचित,टाकळी हाजी मीना शाखा कर्मचारी दत्तात्रय आढाव,संदीप शितोळे उपस्थित होते.येणा-या पुढील काळात १००% पाणी पट्टी भरुन जास्तीत जास्त टिबक व तुशार सिंचनाचा वापर करुन पाण्याची बचत करुन जलसंपदा विभागाला सहकार्य करावे अशी माहीती वायसे यांनी यावेळी दिली.

## अशासकीय अनुदानित महाविद्यालयांत ५,०१२ सहाय्यक प्राध्यापक भरतीला मंजुरी

पुणे (दै. संध्या)

**आरक्षण अंमलबजावणीसाठी विशेष प्रशिक्षण**



राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न उच्च शिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गात एकूण रिक्त असलेल्या पदांपैकी पाच हजार १२ रिक्त पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. ही भरती करताना विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांना बिनचूक आरक्षण धोरण अंमलबजावणी करता यावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेत एक दिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून स्वायत्त महाविद्यालयांना, तर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न अन्य महाविद्यालयांतील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांकरिता लागू करण्यात आले. शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने पदभरतीबाबत वेळोवेळी दिलेले निर्देश विचारात घेता, महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे भरणे आवश्यक होते. या अनुषंगाने राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गात एकूण रिक्त असलेल्या पदांपैकी पाच हजार १२ रिक्त पदांच्या भरतीला मान्यता देण्यात आली.

या अनुषंगाने सामाजिक आणि समांतर आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील उपकुलसचिव आणि सहाय्यक कुलसचिव (मागास वर्ग कक्ष) यांच्याकरिता हे प्रशिक्षण झाले. प्रशिक्षणाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले. महाराष्ट्र अध्यापक विकास संस्थेचे कार्यकारी संचालक आणि उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कोल्हापूरचे विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव, नाशिक महसूल विभागीय कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी संदीप पाटील, पुणे महसूल विभागीय कार्यालयाचे सहाय्यक महसूल अधिकारी इक्बाल दरवाजकर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. दिलीप भरड, उच्च शिक्षण संचालनालयाच्या सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे, प्रशासन अधिकारी डॉ. सुयश दुसाने आदी उपस्थित होते.

पदभरतीची बिंदुनामावली प्राथमिक तपासणी, सामाजिक आरक्षणासोबत महिला आणि दिव्यांग यांचे समांतर आरक्षण अचूकपणे कसे राबवावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ. देवळाणकर यांनी प्रास्ताविक केले.

## कॅनडात स्थायिक पत्नीचा पुण्यातील कौटुंबिक हिंसाचार दावा फेटाळला

पुणे (दै. संध्या)

■ मालकी हक्काचा पुरावा न्यायालयीन कार्यक्षेत्रासाठी अपुरा


कॅनडामध्ये वास्तव्यास असलेल्या एका पत्नीने पती आणि त्याच्या कुटुंबियांच्या विरोधात येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात दाखल केलेला कौटुंबिक हिंसाचाराचा दावा अधिकार क्षेत्र नसल्याने फेटाळून लावला. पत्नीने दाखल केलेला दावा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येत नाही, तसेच मालकी हक्काचा पुरावा न्यायालयाचे कार्यक्षेत्रात ठरवू शकत नाही, असे नमूद करत खडकी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एल. व्ही. श्रीखंडे यांनी हा निकाल दिला.

या प्रकरणातील पत्नी रेखा आणि पती सुरेश (नावे बदललेली) याचा मुंबईत लग्न नोंदणी पद्धतीने विवाह झाला होता. त्यानंतर हिंदू विवाह पद्धतीनुसार अलिबाग येथेही विवाह सोहळा पार पडला. पतीचे घर तसेच पत्नीचे माहेर मुंबई येथे असून विवाहानंतर दोघे काही काळ अलिबाग येथे एकत्र वास्तव्यास होते. त्यानंतर दोघेही कॅनडात स्थायिक झाले. पत्नीने कॅनडाचे नागरिकत्व स्वीकारले असून तिचे भारतीय नागरिकत्वही रद्द झाले आहे. पत्नीच्या नावावर पुण्यात विवाहापूर्वीपासून सदनिका असल्याने तिने तोच पत्ता दाखवत पती व त्यांच्या कुटुंबीयांविरोधात कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत पोटगी, नुकसानभरपाई तसेच अन्य मागण्यांसाठी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात दावा दाखल केला होता. या दाव्यात पतीच्या वतीने ॲड. के. टी. आरू-पाटील यांनी बाजू मांडली.

## दारूच्या दुकानासाठी नाहरकत प्रमाणपत्राच्या बदल्यात ६० हजारांची लाच

**वाडेगाव ग्रामसेवक व लिपीक एसीबीच्या जाळ्यात**

बाळापूर (दै. संध्या)



दारूच्या दुकानाचा व्यवसाय सुरू करण्यासाठी ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र देण्याच्या मोबदल्यात ६० हजार रुपयांची लाच स्वीकारताना वाडेगाव येथील ग्रामसेवक आणि लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी (ता. २५) रोजी रंगेहात अटक केली. या कारवाईमुळे महसूल व ग्रामीण विकास वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

योगेश तोताराम कापकर (ग्रामसेवक) आणि सुभाष रामकृष्ण सरप (लिपीक, वय ५७ वर्ष) असे लाचखोर कर्मचाऱ्यांची नावे आहेत. दोन्ही आरोपी ग्रामपंचायत वाडेगाव, येथे कार्यरत आहेत. तक्रारदाराच्या लहान भावाला वाडेगाव येथे 'वैभव वाईन अँड बिअर शॉप' या नावाने नवीन व्यवसाय सुरू करायचा होता. त्यासाठी ग्रामपंचायतीच्या नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता होती. तक्रारदाराने यासाठी ग्रामसेवक योगेश कापकर यांची भेट घेतली असता, कापकर यांनी सुरुवातीला चक्क १ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. तक्रारदाराची लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी ८ मे रोजी अकोला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रितसर तक्रार नोंदवली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १३ मे रोजी पडताळणी केली असता, ग्रामसेवक योगेश कापकर यांनी तडजोडीअंती ६० हजार रुपये लाच घेण्याचे मान्य केले. त्यानंतर १६ मे रोजी बाळापूर येथील ग्रामपंचायतीत सापळा रचण्यात आला होता, मात्र तेव्हा लाचेची रक्कम लिपीक सुभाष सरप यांच्याकडे देण्यास सांगण्यात आले होते. एसीबीच्या पथकाने वाडेगाव ग्रामपंचायत कार्यालयात सोमवारी (ता. २५) रोजी दुपारी १२:३९ ते १:०४ वाजताच्या सुमारास पुन्हा सापळा रचला. ग्रामसेवक योगेश कापकर याने तक्रारदाराकडून ठरलेली ६० हजार रुपयांची लाच पंचांसमक्ष स्वीकारली आणि ती रक्कम लिपीक सुभाष सरप यांच्याकडे सुपूर्द केली. सरप याने ती रक्कम स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने दोघांनाही रंगेहात पकडले. त्यांच्याकडून लाचेची पूर्ण रक्कम जप्त करण्यात आली आहे. दोन्ही आरोपींविरुद्ध बाळापूर पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने अथवा त्यांच्या वतीने कोणत्याही खाजगी व्यक्तीने शासकीय कामासाठी लाचेची मागणी केल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सदर यशस्वी कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक बापू बांगर, अप्पर पोलीस अधीक्षक मा. श्री. सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनात, सापळा अधिकारी मिलिंदकुमार बहाकर (पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि अकोला) तसेच पोलीस अंमलदार दिगंबर जाधव, अविनाश पाचपोर, संदिप ताले, असलम शहा, गोपाल किरडे आणि चालक नफिस शेख यांनी पार पाडली.

# विलीनीकरणाची चर्चा आता संपली

## कार्यकर्त्यांनी संभ्रमात राहू नये – युगेंद्र पवार

बारामती (दै. संध्या)



"पवार विरुद्ध पवार अशीच लढत २०२९ मध्ये होईल, याची आत्ताच खात्री देता येणार नाही. राजकारणात एका वर्षातही खूप काही बदलू शकते. २०२८ मध्ये मला हा प्रश्न विचारा, तेव्हा स्पष्ट सांगता येईल," असे वक्तव्य युगेंद्र पवार यांनी केले. बारामतीत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मुंबईत पक्षातील ज्येष्ठ नेत्यांची बैठक घेतली होती. त्या बैठकीत लवकरात लवकर संघटनात्मक नियुक्त्या पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे युगेंद्र पवार यांनी सांगितले. त्यानुसार पक्ष संघटन मजबूत करण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

पक्षात पद मिळेल, अशी अपेक्षा होती का, या प्रश्नावर बोलताना त्यांनी अप्रत्यक्ष टोला लगावला. "ज्यांचे डिपॉझिट जप्त झाले, त्यांनाही मोठी पदे मिळाली. कदाचित माझ्याच अपेक्षा चुकीच्या असतील. मात्र मला पद न मिळाल्याने लोकांमध्ये अधिक वेळ देता आला. काही लोक पद घेतात; पण त्या पदाला न्याय देत नाहीत. मला तसे करायचे नव्हते," असे ते म्हणाले.

राज्यातील आणि तालुक्यातील परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी नागरिकांमध्ये नाराजी असल्याचे सांगितले. "कांद्याला दर नाही, लोडशेडिंग सुरू आहे, पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. बारामतीत गुन्हेगारी वाढत असून महिलांच्या सुरक्षिततेचाही मुद्दा निर्माण झाला आहे. सत्ता नसतानाही लोकांची कामे करत राहिलो, तर लोक निश्चितपणे आपल्या सोबत येतील," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेबाबत बोलताना युगेंद्र पवार म्हणाले, "विलीनीकरणाबाबत कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम होता. मात्र आता विलीनीकरण होणार नाही, ही भूमिका स्पष्ट झाली आहे. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनीही याबाबत स्पष्ट भूमिका मांडली असून तो संदेश कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे."

"राजकारणात कधी काय होईल सांगता येत नसले, तरी सध्यातरी विलीनीकरणाचा विषय संपला आहे," असेही त्यांनी स्पष्ट केले. विलीनीकरण झाल्यास आपण अजित पवारांसोबत जाणार होतात का, या प्रश्नावर ते म्हणाले, "जर विलीनीकरण झाले असते, तर पवार साहेब आणि अजितदादा यांनी माझी शंभर टक्के काळजी घेतली असती, असा मला विश्वास आहे."

# पेट्रोल डिझेलच्या दरवाढीतून मोदी सरकारचा जनतेच्या खिशावर दरोडा

मुंबई (दै. संध्या)



■ महागाई नियंत्रण करता येत नसेल तर खूर्ची सोडा: हर्षवर्धन सपकाळ

११ दिवसात पेट्रोल-डिझेलच्या किंमतीत प्रति लिटर ८ रुपयांची दरवाढ, हाच अमृतकाळ आहे का?

पेट्रोल-डिझेलची दरवाढ तात्काळ मागे घ्यावी या मागणीसाठी काँग्रेस २६ मेपासून राज्यात आंदोलन करणार

सत्तेत आल्यास पेट्रोल डिझेल ३५ रुपये लिटरने देऊ अशा राणा भिमदेवी थाटात घोषणा करणारे मागील १२ वर्षापासून सत्तेत असताना पेट्रोल-डिझेल-एलपीजी सिलेंडरच्या किमती गगमाला भिडलेल्या आहेत. मागील ११ दिवसातच पेट्रोल डिझेलच्या किमती ८ रुपये प्रति लिटरने वाढवलेल्या आहेत. इराण युद्धाच्या नावाखाली केलेली ही दरवाढ आधीच महागाईने पिचलेल्या जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे. ही दरवाढ सर्वसामान्य जनतेच्या खिशावर दरोडा टाकणारी असून सरकारने तात्काळ मागे घ्यावी आणि महागाई नियंत्रणात ठेवता येत नसेल तर नरेंद्र मोदींनी खुर्ची सोडावी, असा घणाघाती हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

इंधन दरवाढीवर भाजपा सरकारचा खरपूस समाचार घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, इराण युद्धाचे नाव पुढे करून केलेली दरवाढ ही दिशाभूल करणारी आहे. गेल्या १२ वर्षांत नरेंद्र मोदी सरकारने, पेट्रोलच्या किमती ३८ टक्क्यांनी, तर डिझेलच्या किमती ६२ टक्क्यांनी वाढवल्या आहेत, त्यावेळी तर इराण इस्त्राईलचे युद्ध नव्हते. पेट्रोल डिझेलच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारातील क्रूड ऑईलच्या दरानुसार ठरतात हे सर्वांनाच माहित आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारच्या कार्यकाळात कच्च्या तेलाचे दर १०० डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचले असतानाही, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती ७२ रुपये लिटरच्या वर जाऊ दिल्या नाहीत. महागाईचा भार डॉ. मनमोहनसिंह यांनी जनतेवर पडू दिला नाही. पण मोदी सरकारच्या काळात कच्च्या तेलाचा भाव ५०-५५ डॉलर्स प्रति बॅरलच्या आसपास रेंगाळत होता तेव्हाही पेट्रोल १०० च्या आसपास विकले जात होते. आतातर नरेंद्र मोदी सरकार इथेनॉलमिश्रित निकृष्ट दर्जाचे पेट्रोल ११० रुपये प्रति लिटर दराने विकत आहे.

# एकदिवसीय रमाई साहित्य संमेलनाचे ३० मे रोजी आयोजन

## संमेलनाच्या अध्यक्षपदी रमणी सोनवणे यांची निवड

पुणे (दै. संध्या)




महामाता रमाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीने महामाता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृतिदिनानिमित्त तसेच स्मारकाच्या ८ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी एकदिवसीय ‘रमाई साहित्य संमेलन’ आयोजित करण्यात आले असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी विद्रोही कवयित्री,लेखिका, व्याख्याती,अभिनेत्री रमणी सोनवणे यांची निवड करण्यात आल्याची माहिती या संमेलनाचे मुख्य समन्वयक विठ्ठल गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी ॲड. नितीन घोडके, ॲड. क्षितिज खरात, संजोग कांबळे, माजी नगरसेविका लाताताई राजगुरू, श्रीमंत कोतले आदि मान्यवर उपस्थित होते.

संमेलनाची अधिक माहिती देताना विठ्ठल गायकवाड म्हणाले, कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाई आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून होईल. त्यानंतर सर्वधर्म प्रतिनिधींच्या उपस्थितीत वाडिया कॉलेज शेजारील रमाई राष्ट्रीय स्मारक येथे उद्‌घाटन समारंभ पार पडणार आहे.

सकाळी ‘मी राजगृहातील रमाई बोलते’ हा एकपात्री कार्यक्रम सादर करण्यात येणार असून प्रा. रमणी सोनवणे (पुणे) या कार्यक्रमाचे सादरीकरण करणार आहेत. दुपारच्या सत्रात रमाई आणि भीमराव यांच्या लेकरांचे कवी संमेलन होणार आहे. यामध्ये लोककवी भगवान धेंडे व इतर कवी सहभागी होणार आहेत.

सायंकाळच्या सत्रात साहित्य संमेलनाध्यक्ष प्रा. रमणी सोनवणे यांचे अध्यक्षीय भाषण, ठराव वाचन, विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गुणगौरव, तसेच ‘आम्ही भारताचे लोक आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ’ यांच्या वतीने कविता, गझल व गीत गायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

स्वरांजली संगीत समूहाकडूनही विशेष गीत-संगीत रजनी सादर होणार आहे.

पहिल्या रमाई साहित्य संमेलन अध्यक्षपदी निवड झालेल्या प्रा. रमणी सोनवणे या विद्रोही कवयित्री, लेखिका, व्याख्याती, अभिनेत्री, माणूसपणाच्या समतावादी चळवळीच्या कार्यकर्ती आहेत. त्यांचे शिक्षण एम. ए. नेट पॉलिटिकल सायन्स असून सध्या त्या मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स येथे कार्यरत आहेत. वयाच्या १६ व्या वर्षापासून चळवळीत अभिनय, लेखन, कवितांच्या माध्यमातून मनपरिवर्तन आणि महामाता, महापुरुष सर्व समाज स्तरांपर्यंत पोहचवण्याचे काम करत आहेत. सावित्रीबाई फुले, होय मी राजगृहातील रमाई बोलतेय, मी तुमची राजमाता जिजाऊ आदि एकपात्रीचे त्या सादरीकरण करत असतात. गोरगरीब मुलांसाठी मोफत शिकवणी, स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना मराठी, राज्यशास्त्र व आंतरराष्ट्रीय राजकारण आणि समाजशास्त्र या विषयांचे मार्गदर्शन त्या करत असतात असेही गायकवाड यांनी सांगितले.

# बिलोली ग्रामीण रुग्णालयातील निकृष्ट आहारावरून खळबळ

## तुकाराम मुंडे, मुख्यमंत्र्यांकडे तक्रार; राज्यातील रुग्णालये तपासण्याची मागणी

नांदेड (दै. संध्या)



नांदेड जिल्ह्यातील बिलोली ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना दिला जाणारा आहार निकृष्ट दर्जाचा असून रुग्णांना अनेक दिवस उपाशी ठेवले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी माहिती अधिकार कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि तत्कालीन अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करत तात्काळ चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे.

लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी मा. सह आयुक्त/आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बिलोली ग्रामीण रुग्णालयात कंत्राटदाराकडून रुग्णांना वेळेवर डायट दिला जात नाही. अन्न शिळे, अर्धकच्चे, पोषणमूल्य नसलेले व भेसळयुक्त असल्याची शंका त्यांनी व्यक्त केली आहे. "अनेकदा रुग्णांना दिवसभर उपाशी राहावे लागते. अशा अन्नामुळे रुग्णांना जुलाब, उलट्या, कुपोषण व इतर आजार होत असून बरे होण्याऐवजी प्रकृती अधिक बिघडत आहे," असे निवेदनात नमूद केले आहे.


अन्न सुरक्षा कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यावर निवेदनात अन्न सुरक्षा व मानके कायदा, 2006 चा दाखला देत रुग्णांना सुरक्षित व सकस आहार मिळणे बंधनकारक असताना त्याचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. खालील प्रमुख मागण्या करीत बिलोलीसह राज्यातील इतर ग्रामीण रुग्णालयांमधील आहाराचे अचानक नमुने घेऊन तपासणी करावी. रुग्णांना उपाशी ठेवणाऱ्या कंत्राटदाराची सखोल चौकशी व्हावी. भेसळ किंवा निकृष्ट दर्जा आढळल्यास कंत्राटदारावर फौजदारी गुन्हा दाखल करून कंत्राट रद्द करावे व काळ्या यादीत टाकावे. पर्यायी व्यवस्था करण्यात यावे म्हणजे कारवाई पूर्ण होईपर्यंत रुग्णांना दर्जेदार आहार मिळेल याची व्यवस्था करावी. राज्यातील रुग्णालया मध्ये नियमित तपासणी करण्यात यावे जेणेकरून भविष्यात अशी घटना टाळण्यासाठी सर्व ग्रामीण रुग्णालयांत नियमित तपासणीचे आदेश द्यावेत.

ही तक्रार मा. जिल्हाधिकारी नांदेड, जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड, व वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय बिलोली यांनाही सादर करण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व अन्न व औषध प्रशासनाचे तत्कालीन आयुक्त तुकाराम मुंडे यांचेही लक्ष वेधण्यात आले आहे.

> “रुग्णांच्या जीविताशी संबंधित ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन ठोस कारवाई करावी,” अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी केली आहे. या तक्रारीनंतर अन्न व औषध प्रशासन विभाग काय भूमिका घेते याकडे संपूर्ण राज्यासहीत नांदेड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# आठ हजारांहून अधिक गावांना पाणीटंचाईच्या तीव्र झळा !

नागपूर (दै. संध्या)



राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिकृत साप्ताहिक अहवालानुसार, राज्यातील १५ जिल्ह्यांमधील ६३३ गावे आणि १,६५२ वाड्या-वस्त्या टंचाईग्रस्त घोषित असून, तिथे ७०६ टँकर्सद्वारे (३३ शासकीय व ६७३ खासगी) पाणीपुरवठा केला जात आहे. म्हणजेच कागदावर केवळ २,२८५ महसुली गावे व वाड्या तहानलेल्या दाखवल्या आहेत. प्रत्यक्षात राज्यातील तब्बल आठ ते नऊ हजार गावे आणि वाड्या सध्या तीव्र पाणीटंचाईचा सामना करत आहेत, प्रत्यक्षात राज्यातील तब्बल आठ ते नऊ हजार गावे आणि वाड्या सध्या तीव्र पाणीटंचाईचा सामना करत आहेत, ही आकडेवारी केवळ प्रशासकीय निकषांच्या चौकटीत बसणाऱ्या आणि टैंकर मंजूर झालेल्या गावांचीच आहे. त्यामुळे पावसाला अजून काही कालावधी असल्याने प्रशासनाने स्थानिक पातळीवर जलद उपाययोजना करावी, अशी मागणी येथील दुष्काळग्रस्त नागरिकांकडून केली जात आहे. प्रत्यक्ष ग्राउंड रिॲलिटी पाहिली, तर टैंकर मंजुरीच्या जाचक अटी आणि कागदोपत्री 'टँकरमुक्त जिल्हा' दाखवण्याच्या प्रशासकीय दबावामुळे हजारो गावांचे टैंकर प्रस्ताव लालफितीत अडकले आहेत. प्रत्यक्षात राज्यातील तब्बल आठ ते नऊ हजार गावे आणि वाड्या सध्या तीव्र पाणीटंचाईचा सामना करत आहेत, हा आकडा अधिकृत सरकारी आकड्यापेक्षा तब्बल तीन ते चार पटींनी जास्त असण्याची शक्यता सूत्रांनी वर्तविली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पुण्यातील रॅडिसन ब्लू हॉटेलमध्ये रंगला फॅशन आणि आकर्षणाचा भव्य सोहळा

पुणे (दैनिक संध्या) : शहरातील फॅशनविश्वाला ग्लॅमर आणि स्टाइलची नवी झळाळी देणारा ‘रनवे हाइस्ट सीझन-२’ हा भव्य सोहळा २४ मे २०२६ रोजी हिंजवडी येथील रॅडिसन ब्लू हॉटेल पुणे हिंजवडी येथे उत्साहात पार पडला. पूजा सिंह यांच्या संकल्पनेतून आणि दिवा पेजंट्सच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने पुण्यातील फॅशनप्रेमींचे विशेष लक्ष वेधून घेतले. देशभरातील ५० हून अधिक मॉडेल्सनी आकर्षक पदभ्रमण सादर करत आपल्या अदाकारीची मोहिनी उपस्थितांवर घातली. कार्यक्रमात विविध नामांकित वेशभूषाकार आणि वस्त्रसंग्रहांनी विशेष दाद मिळवली. डोर – ड्रेस ऑन रेंट, बीइंग डिझायनर सिमी, पोश, पुष्पांचल, रॉयल टास्टा तसेच प्रियांका दुबे यांच्या आकर्षक आणि आधुनिक वस्त्रसंग्रहाने उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्यात अनुपमा सिंह, रिधमा काकाणी, लता पांडे, निशा यादव, नीलू मेहता, रेखा पलाडी, आरती बोरोले, मेहर इक्बाल आणि अभिज्ञा खोबरागडे यांनी मोहक उपस्थिती दर्शवत कार्यक्रमाची रंगत अधिक वाढवली. भव्य सादरीकरण, आकर्षक पदप्रदर्शन, मान्यवरांची उपस्थिती आणि आलिशान वातावरणामुळे हा सोहळा पुण्यातील वर्षातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या कार्यक्रमांपैकी एक ठरला.

### भाजपचे 100 नगरसेवक आमच्या संपर्कात! वडेट्टीवारांचा महाविस्फोट

नागपूर (दैनिक संध्या) : आगामी विधान परिषद निवडणुकीत लोकशाहीचा जाहीर लिलाव सुरू असून, एका एका नगरसेवकाला १५-१५ लाख रुपयांचे टोकन दिल्याचा उघड घोडेबाजार सुरू आहे. ही निवडणूक तब्बल १०० कोटींची आहे,असा खळबळजनक आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी नागपुरात केला. या निवडणुकीत सर्वसामान्य आणि प्रामाणिक माणसांचे राजकारण संपले असून भविष्यात विधान परिषदेत केवळ मोठे उद्योगपती आणि कंत्राटदारच दिसतील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. तसेच "भाजपचे १०० हून अधिक नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत आणि त्यांच्यात तीव्र अंतर्गत वाद आहेत," असा दावाही त्यांनी केला. यवतमाळ विधान परिषद आणि शिवानी वडेट्टीवार यांच्या उमेदवारीबाबत बोलताना वडेट्टीवार म्हणाले, "अद्याप काहीही ठरलेले नाही. आज दुपारी ३ वाजता महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची झूम मीटिंग असून, त्यात जागावाटपाचा अंतिम निर्णय होईल. भाजपचा उमेदवार कोण येतो आणि त्यांची काय खेळी आहे, हे पाहूनच आम्ही आमचा अधिकृत निर्णय जाहीर करू." उद्योगपती अरुण लाखानी यांच्या उमेदवारीवर बोलताना त्यांनी, ते उद्योगपती आहेत, त्यांचे संबंध मोठ्या राजकीय घराण्यांशी आहेत. अशा निवडणुका आमच्यासारख्या सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेरच्या आहेत, असा टोला लगावला. देशातील पेट्रोल-डिझेल टंचाईवर बोलताना वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारवर अत्यंत गंभीर आरोप केले. "ही टंचाई कृत्रिम नसून सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे निर्माण झाली आहे. अमेरिकेने भारताला इराण आणि रशियाकडून तेल खरेदी न करण्याचा फतवा काढला आहे. पंतप्रधानांचा हात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी दगडाखाली ठेवला आहे, म्हणूनच देश अमेरिकेच्या दावणीला बांधला गेलाय. पुढच्या महिनाभरात पेट्रोल १५० रुपये आणि डिझेल १४० रुपयांवर जाईल. देशात कोरोनापेक्षाही भीषण आर्थिक विस्फोट होईल आणि देश उद्‌ध्वस्त होईल, असा इशारा त्यांनी दिला. तसेच "मोदींच्या अपयशावर पुस्तक काढले तर त्याला सर्वाधिक लाईक्स मिळतील, अशी खोचक टीकाही त्यांनी केली. पुण्यातील गुन्हेगारी आणि ड्रग्ज प्रकरणावर बोलताना वडेट्टीवार यांनी गृहखात्याला धारेवर धरले. पुणे शहर आज महिला अत्याचार, खून आणि ड्रग्जमध्ये पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाले आहे. पोलिसांचा धाक संपला असून त्यांचे संपूर्ण लक्ष फक्त हप्तेवसुलीकडे आहे. गेल्या १० वर्षांत ४ लाख ६० हजार मुली बेपत्ता झाल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे, पण सरकार खोटे आकडे सांगत आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था संपली असून आता फक्त 'काय द्यायचं' (भ्रष्टाचार) हेच शिल्लक राहिले आहे, असा थेट आरोप त्यांनी नाशिक जेलमधील व्हायरल व्हिडिओचा संदर्भ देत केला.

# अजितदादांच्या राष्ट्रवादीत खळबळ!

मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेसमधून एक मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यपाल कोट्यातील आमदार इद्रिस नायकवडी यांच्याकडे पक्षाकडून आमदारकीचा राजीनामा मागण्यात आल्याचे वृत्त आहे. विशेष म्हणजे, नायकवडी यांनी हा राजीनामा देण्यास स्पष्ट नकार दिल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पंधरा दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या ओएसडींनी आमदार इद्रिस नायकवडी यांना राजीनाम्या संदर्भात थेट निरोप दिला होता. दरम्यान, नायकवडी यांनी राजीनामा देणार नसल्याचे स्पष्ट केले. आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका युवा नेत्याने पुन्हा एकदा इद्रिस नायकवडी यांच्याकडे आमदारकीचा राजीनामा देण्याची मागणी केल्याचे बोलले जात आहे. अजितदादा हयात असताना त्यांनी मला राजीनामा देण्या संदर्भात कधीही काहीही सांगितले नव्हते. त्यामुळे मी आता राजीनामा देणार नाही," अशी भूमिका नायकवडी यांनी घेतल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. दरम्यान, उद्या राष्ट्रवादी काँग्रेसची एक अत्यंत महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये आमदार इद्रिस नायकवडी यांच्या राजीनाम्याच्या मुद्द्यावर आणि विधान परिषदेच्या निवडणुकीवर चर्चा होणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे उद्याच्या बैठकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. या प्रकरणावर आमदार इद्रिस नायकवडी यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. 'या बातम्या फक्त 'वावड्या' असल्याचे सांगत चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. "प्रत्यक्षात असे काहीच घडलेले नाही. या सर्व बातम्या माझ्याही कानावर येत आहेत. मला पक्षाकडून असा कोणताही अधिकृत निरोप आलेला नाही.

# वसई-विरारमधील नागरिक दहशतीत !

भिवंडी (दै. संध्या)

■ भटक्या कुत्र्यांचा ४ महिन्यांत १५ हजार जणांना चावा. रेबिज मुळे एकाच मृत्यू



वसई-विरार शहरात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट आणि श्वानदंशाच्या वाढत्या घटनांमुळे वसई-विरार शहर महानगरपालिकेने युद्धपातळीवर उपाययोजना सुरू केल्या आहेत.

शहरात अवघ्या ४ महिन्यांत १५ हजार श्वानदंशाच्या केसेस समोर आल्या आहेत.

वसई-विरार उपनगरांमध्ये भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट आणि कुत्र्यांनी चावा घेण्याच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या गंभीर समस्येची दखल घेत वसई-विरार शहर महानगरपालिकेने (VVCMC) भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या उपाययोजनांची घोषणा केली आहे. यामध्ये खाजगी संस्थांच्या मदतीने कुत्र्यांची नसबंदी मोहीम जलद गतीने राबवणे आणि त्यांच्यासाठी एक स्वतंत्र शेल्टर होम उभारणे समाविष्ट आहे.

पालिकेच्या अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वसई-विरार जुळ्या शहरांमध्ये सध्या अंदाजे १ लाख भटके कुत्रे आहेत. मात्र, यापैकी आतापर्यंत केवळ ३० हजार कुत्र्यांचीच नसबंदी करण्यात पालिकेला यश आले आहे. उर्वरित ७० हजार कुत्र्यांमुळे शहरात त्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

या वर्षाच्या जानेवारी ते एप्रिल या अवघ्या ४ महिन्यांच्या कालावधीत शहरात तब्बल १५ हजार कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना नोंदवल्या गेल्या आहेत.

नुकतेच एका ९ वर्षांच्या चिमुकलीचा भटक्या कुत्र्याने चावा घेतल्यामुळे आणि रेबीज संसर्ग झाल्यामुळे तिचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेनंतर वसई-विरारमधील नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि पालिकेच्या कारभाराविरुद्ध प्रचंड रोष निर्माण झाला आहे.

> महानगरपालिकेच्या महासभेत विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या मुद्द्यावरून सत्ताधाऱ्यांना आणि प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. वाढत्या दबावानंतर महापौर राजीव पाटील यांनी सांगितले की, कुत्र्यांच्या नसबंदीचा वेग वाढवण्यासाठी पालिकेने आता खाजगी संस्था आणि प्राणी कल्याण संघटनांची मदत घेण्याचे ठरवले आहे.

# भिवंडीचे महापौर नारायण चौधरी ॲक्शन मोडमध्ये

## महापौरांनी जीन्स फॅक्टरी सील केली

भिवंडी (दै. संध्या)



भिवंडी महापौर नारायण चौधरी, महानगरपालिका अधिकाऱ्यांसोबत गटार साफसफाईच्या दौऱ्यावर असताना, त्यांना जवळच एक जीन्सचा कारखाना आढळला. तिथे मोठ्या प्रमाणात रसायने, रंग आणि इतर संशयास्पद सामग्रीचा वापर केला जात होता. रसायनांनी दूषित झालेले त्याचे पाणी गटारात वाहत होते. यामुळे संतप्त झालेल्या महापौर नारायण चौधरी यांनी ॲक्शन मोडमध्ये येत कारखाना सील करण्याचे आदेश दिले.

महापौरांच्या आदेशानुसार, महानगरपालिका प्रशासनाने कारखाना सील केला. महापौर चौधरी यांचे विशेष असे की, भिवंडी महानगरपालिका प्रशासन सध्या गटारे स्वच्छ करण्यासाठी आणि रस्त्यांच्या कडेवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी जोरदार मोहीम राबवत आहे आणि महापौर नारायण चौधरीही महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत विविध भागांचा दौरा करत होते. तपासणीदरम्यान, त्याना विभागीय समिती क्रमांक १ च्या हद्दीत एक बेकायदेशीरपणे चालणारा जीन्सचा कारखाना आढळून आला. तिथे मोठ्या प्रमाणात रसायने, रंग आणि इतर संशयास्पद सामग्री वापरली जात होती, जी पर्यावरणासाठी अत्यंत हानिकारक होती.

महापौर नारायण चौधरी यांनी कारखान्याच्या आत पसरलेली घाण आणि नियमांची अवहेलना पाहिली. ते संतप्त झाले. कारखान्यात सुरक्षा मानकांचे पालन केले जात नसल्याचे वृत्त होते, ज्यामुळे आजूबाजूच्या नागरिकांच्या आरोग्याला आणि पर्यावरणाला धोका निर्माण होऊ शकला असता. महापौर चौधरी यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना कारखान्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले. महापौरांचा आदेश मिळताच, महानगरपालिका प्रशासनाने तातडीने कारवाई करत कारखाना तात्काळ सील केला. या कारवाईदरम्यान, अधिकाऱ्यांनी कारखान्यात साठवलेल्या विविध रसायनांची आणि रंगांचीही तपासणी केली.

महापौर नारायण चौधरी स्पष्ट शब्दांत म्हणाले की,भिवंडी शहरात

कोणत्याही प्रकारची गैरकृत्ये किंवा बेकायदेशीर कृती खपवून घेतली जाणार नाही. त्याचप्रमाणे, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. असा इशारा देण्यात आलेला आहे. या कारवाईनंतर, अवैध व्यापारात गुंतलेल्यांमध्ये खळबळ उडाली असून, स्थानिक नागरिकांमध्येही खळबळ माजली आहे.प्रशासनाच्या या कृतीचे भिवंडी मध्ये स्वागत करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### साधना, भक्ती, जप, तप, दान आणि आत्मचिंतनासाठी श्रेष्ठ : आनंद महाराज तांबे

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : सर्व महिन्यांमध्ये अधिक मास किंवा पुरुषोत्तम मास हा अत्यंत पवित्र आणि विशेष मानला जातो. हा महिना साधना, भक्ती, जप, तप, दान आणि आत्मचिंतनासाठी श्रेष्ठ मानला गेला आहे. या मासानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे संत परंपरेनुसार भव्य 'अखंड हरिनाम सप्ताह' सोहळे मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात. भगवान श्रीकृष्णाने मलमासाला 'पुरुषोत्तम' हे नाव देऊन अलौकिक मानसन्मान दिला. मानवी जिवनातील गुरुचे महात्म्य विवेचन केले. समाजहितासाठी गुरु सर्वस्वाचा त्याग करुन समाजाला योग्य दिशा देण्यासाठी ईश्वर भक्तीच्या माध्यमातून जिवन समर्पित करतात असे प्रतिपादन अखिल भारतीय वारकरी मंडळाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष ह.भ.प आनंद महाराज तांबे यांनी 'पुरुषोत्तम मास नाम सप्ताह' श्री नवनाथ ग्रंथ पारायण व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा या निमित्ताने किर्तनरुपी सेवेतून उपस्थितांना मार्गदर्शन करताना सेवेचं व अधिक मास बाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले. श्री.नाथयोगाश्रम मठ पंढरपूर येथे सिद्धसद्गुरू शांतीनाथजीमहाराज पंढरपूर यांचे आशीर्वाद व मार्गदर्शनाखाली सोहळा संपन्न होत आहे. यावेळी सद्गुरु शिलनाथजी महाराज, सद्गुरु रंगनाथजी महाराज, सद्गुरु गोपालनाथजी महाराज, सद्गुरु मंगलनाथजी महाराज, सद्गुरु संतोषनाथजी महाराज, मंगेशनाथजी, निरंजननाथ महाराज, नंदुशेठ कामठे, राम आण्णा नागवडे, आबासाहेब जगदाळे ह.भ.प.सर्जेराव फराटे गुरुजी, स्वामिजी, बाल किर्तनकार संस्कार महाराज लोडम, सर्जेराव म्हस्के, प्रदिप वाघले, बापुसो चौधरी, सुनिल तुपे, रामेश्वर म देशमुख आळंदी, केदारी महाराज उपस्थित होते.



### डॉ. ऋषिकेश खोडदे यांना पीएचडी

चाकण (दैनिक संध्या) : चाकण येथील डॉ. प्रा. ऋषिकेश हरिभाऊ खोडदे यांनी नॅनो पार्टिकल संशोधन विषयातून पीएचडी ही मानाची पदवी संपादन केली. डॉ. ऋषिकेश खोडदे हे येथील आदर्श शिक्षक हरिभाऊ सहादू खोडदे व हिरा हरिभाऊ खोडदे यांचे सुपुत्र आहेत. डॉ. ऋषिकेश यांनी नॅनो पार्टिकल संशोधन विषयातून पीएच.डी. ही मानाची पदवी संपादन करून चाकणचा नावलौकिक वाढविला आहे. अथक परिश्रम, जिद्द आणि संशोधनाची प्रचंड आवड यांच्या जोरावर त्यांनी ६ पेटंट्स व ४ आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित करत विज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विशेषतः कॅन्सर उपचारासाठी उपयुक्त ठरणारे त्यांचे संशोधन भविष्यात मोलाचे योगदान देणारे ठरणार आहे. प्रा. डॉ. दीपक शेळके व प्रा. डॉ. अमोल सोनवणे यांचे त्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच पत्नी चैत्राली यांचे खंबीर सहकार्यही प्रेरणादायी ठरले. आई - वडिलांनी दिलेले संस्कार, शिक्षणाची प्रेरणा आणि पाठबळ यामुळेच डॉ. ऋषीकेश खोडदे यांनी हा मानाचा टप्पा गाठला आहे.

### स.पो.नी. प्रियांका पवार यांचा पत्रकारांच्या वतीने सन्मान



जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र पोलीस दलातील संवेदनशील प्रकरणे हाताळणाऱ्या कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक म्हणून ओळख निर्माण करत, सामाजिक भान, महिलांप्रती संवेदनशीलता आणि गुन्हे तपासातील कार्यक्षमतेमुळे विशेष ठसा निर्माण करणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक श्रीमती प्रियांका पवार (प्रियांका सुरेश वांजळे) यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती झाली आहे. या नियुक्ती बद्दल जेजुरी येथे पत्रकारांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. महिला विषय महत्त्वाचे गंभीर गुन्हे तपास, नागरिकांची सुरक्षा व समुपदेशन तसेच तपासातील कौशल्य यामुळे त्यांना बढती मिळाली आहे. २०२१ ते २०२४ दरम्यान लोणीकंद पोलीस स्टेशन व येरवडा पोलीस स्टेशन येथे कार्यरत असताना त्यांनी महिलांवरील अत्याचार, लहान मुलांवरील गुन्हे, कौटुंबिक वाद यांसारख्या संवेदनशील प्रकरणांमध्ये प्रभावी तपास व समुपदेशनाचे काम केले. अनेक तणावग्रस्त कुटुंबांमध्ये संवाद घडवून आणत कुटुंब संस्था टिकवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. तसेच मानसिक विकलांग व अनाथ बालकांना सामाजिक संस्थांमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला. सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर शाळा महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षितता, सोशल मीडिया वापरातील धोके आणि कायदेशीर बाबींविषयी मार्गदर्शन करण्याचे कामही त्यांनी सातत्याने केले आहे. सामाजिक कार्याची आवड असल्याने सातत्याने समाजातील विविध घटकातील लोकांशी संवाद साधत होत्या. वेगवेगळ्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत मदत करण्याचा त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रयत्न केला आहे.







# ‘हिंदकेसरी सुलतान’ रेडा ठरला मुख्य आकर्षण

**‘पुरंदर कृषी एक्स्पो २०२६’**

**शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद**

सासवड (दै. संध्या)



सासवड येथील शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर स्व. चंदुकाका जगताप यांनी स्थापलेल्या शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने दि. २२ ते २५ मे या कालावधीत आयोजित केलेल्या भव्य 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' या कृषी व पशू प्रदर्शनाला पुरंदरसह संपूर्ण जिल्ह्यातील शेतकरी, युवक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रचंड गर्दी केली होती.

या चार दिवसीय प्रदर्शनातील पशू प्रदर्शनाला नागरिकांनी सर्वाधिक आणि उत्तम प्रतिसाद दिला. प्रदर्शनात गाय, बैल, रेडा, बोकड यांच्या विविध जातिवंत जनावरांचा समावेश होता. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील हसुर येथील अरविंद बोटे यांच्या अडीच वर्षे वयाच्या आणि तब्बल एक टन वजनाच्या 'हिंदकेसरी सुलतान' या रेड्याने सर्वांचेच विशेष लक्ष वेधून घेतले. मुऱ्हा जातीच्या या देखण्या रेड्याने यापूर्वी अनेक स्पर्धा जिंकल्या आहेत. याबरोबरच, राकेश कोळेकर यांचा 'कायना झिंग' जातीचा अवघ्या दोन फूट उंचीचा पांढराशुभ्र 'चायनाचा सुलतान' नावाचा बोकडही शेतकऱ्यांमध्ये आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. या बोकडाच्या शिंगांची लांबी सव्वा फूट, वजन २५ किलो असून त्याच्या शरीरावर संपूर्ण लांब केस आहेत.

प्रदर्शनात राहुल मोकाशी यांचा जमनापुरी जातीचा देखणा बोकड. भरत झेंडे यांचा पतिरा जातीचा बोकड. संतोष सोनवणे यांची संपूर्ण काळ्या रंगाची दुर्मिळ 'कपिला गाय'.रमेश जगताप व धनंजय जगताप आणि इतर शेतकऱ्यांच्या बळकट खिल्लार बैलजोड्या, काजळी खिल्लार जोड आणि भरघोस दूध देणारी होल्स्टेन गाय. यांनीही शेतकऱ्यांचे लक्ष वेधले.

या भव्य कृषी महोत्सवाला महाराष्ट्रातील राजकीय आणि सहकार क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी भेट दिली. यामध्ये कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राजेंद्र पाटील, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप, माजी आमदार दिलीप मोहिते, जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, संचालक आप्पासाहेब जगदाळे, संजय काळे, प्रदीप कंद, पुजा बुट्टे पाटील, निर्मला जागडे, अशोक पवार, तसेच कात्रज डेअरीचे अध्यक्ष स्वप्निल ढमढेरे आणि उपाध्यक्ष तानाजी जगताप, भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ शिवाजीराव कदम, के जे इन्स्टिट्यूटचे प्रमुख कल्याणराव जाधव, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव, विश्वस्त प्रा. डॉ. एम एस जाधव यांसह विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती लावली.

अतिथींनी आणि हजारो शेतकऱ्यांनी मिळून या यशस्वी प्रदर्शनाचे आयोजक माजी आमदार संजय जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप आणि समरादित्य जगताप यांचे मनापासून आभार मानले व कौतुक केले. आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि पशुधनाची योग्य माहिती ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात हे प्रदर्शन मैलाचा दगड ठरले आहे. सर्व पशुपालकांचा आयोजक माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## रात्री १० नंतर हॉकर्स, टपऱ्या, रस्त्यावरील खाद्यगाड्या बंद

पुणे (दै. संध्या)

**सारसबाग, नदीपात्र चौपाट्यांवरही निर्बंध**

शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते, हॉकर्स, गाड्या आणि पानटपऱ्या रात्री १० वाजेनंतर बंद करण्यात येणार आहेत. त्यामध्ये सारसबाग आणि नदीपात्रासह इतर चौपाट्यांवरीलही खाद्यपदार्थ विक्री रात्री दहानंतर बंद राहील, असे पोलिसांनी स्पष्ट केले. गेल्या काही दिवसांपासून शहरात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. रात्रीच्या वेळी टपऱ्या आणि खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर होणारी गर्दी, त्यातून होणारे वाद आणि भाईगिरीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर शहरात रात्रीची नाकाबंदी आणि पोलिसांची गस्त देखील वाढवण्यात आली आहे. पोलिसांच्या या निर्णयामुळे रात्रीच्या वेळी व्यवसाय करणाऱ्या छोट्या विक्रेत्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. रात्री उशिरापर्यंत चालणारे स्टॉल्स आणि हॉकर्समुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. शहरात रात्रीच्या वेळी येणाऱ्या-जाणाऱ्या संशयास्पद वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. महत्त्वाचे चौक आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचे अड्डे असणाऱ्या भागांत पोलिसांची गस्त वाढविण्यात आली आहे.

## अपघात टाळण्यासाठी अंतर्गत रस्त्यावर बसविले गतिरोधक

**साहेबराव कड व विजया जाधव यांच्या प्रयत्नांना यश**

चाकण (दै. संध्या)



ओव्हरटेकच्या प्रयत्नात चाकण शहरात अंतर्गत रस्त्यावर अपघाताचा सिलसिला सुरू असल्याने वाढते अपघात रोखण्यासाठी गतिरोधक बसविण्यात आले आहेत.

खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्या सहकार्याने व प्रभाग क्रमांक अकराचे नगरसेवक साहेबराव कड व नगरसेविका विजया जाधव यांनी यासाठी वारंवार पाठपुरावा केला होता. चाकण मधील परदेशी मेडिकल ते जंजिरा हॉटेल या रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची नितांत गरज होती. या रस्त्यालगत संग्राम दुर्ग किल्ला, प्राथमिक शाळा, चक्रेश्वर मंदिर, दवाखाने, व्यवसायिकांची छोटी मोठी दुकाने, व्यापारी संकुल असल्याने नागरिकांची दिवसभर मोठी वर्दळ असते. या रस्त्यावरून भरधाव जाणाऱ्या वाहनांमुळे छोटे मोठे अपघात होत होते.

शालेय विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून जावे लागत होते. दररोज होत असलेले अपघात रोखण्यासाठी या प्रभागातील नगरसेवकांनी पुढाकार घेउन गतिरोधक बसविण्याचे काम पूर्ण करून घेतले. याप्रसंगी गटनेते साहेबराव कड, नगरसेविका विजया जाधव, उद्योजक दत्तात्रय जाधव, सचिन परदेशी, देवेंद्र परदेशी, संदीप जाधव, जयेश गावडे, निलेश तोरवणे, अनिकेत चव्हाण, मोहन वाव्हळ, उद्योजक चेतन कौटकर आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. चाकण मध्ये अंतर्गत रस्त्यावर गतिरोधक बसविल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## रसायू कॅन्सर क्लिनिक व उत्तराखंड आयुर्वेद विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार

पुणे (दै. संध्या)



कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी लढा देण्यासाठी पारंपरिक आयुर्वेद आणि आधुनिक वैद्यकीय शास्त्र (ॲलोपॅथी) यांचा मेळ घालणे ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने, पुण्यातील नामांकित रसायू कॅन्सर क्लिनिक आणि उत्तराखंड आयुर्वेद विद्यापीठ यांच्यात शैक्षणिक आणि संशोधनासाठी सामंजस्य करार करण्यात आले आहे. कर्करोग संशोधनाला नवी दिशा देणाऱ्या या करारात नाविन्यपूर्ण आणि भविष्यवेधी तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.

हरिद्वार येथील गुरुकुल कॅम्पसच्या कॅन्सर रिसर्च ओपीडीमध्ये हा औपचारिक करार सोहळा नुकताच झाला. उत्तराखंड आयुर्वेद विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. अरुणकुमार त्रिपाठी आणि रसायू लाईफसायन्सेसचे रिसर्च व एज्युकेशनचे प्रमुख डॉ. अविनाश कदम यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. संशोधनावर आधारित आयुर्वेदाला कर्करोग उपचारांच्या मुख्य प्रवाहात आणणे, हा या भागीदारीचा मुख्य उद्देश असून भविष्यात या माध्यमातून कॅन्सर रुग्णांना मोठा दिलासा मिळण्याची आशा व्यक्त होत आहे.

या कराराच्या औचित्याने हरिद्वारमध्ये दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कर्करोग सल्ला व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांना मोफत सल्ला दिला. कर्करोगाचे वेळेत निदान, आजाराची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, जीवनशैलीतील आवश्यक बदल आणि उपलब्ध उपचार पद्धती याबाबत रुग्णांमध्ये जनजागृती करण्यात आली.

प्रा. डॉ. अरुणकुमार त्रिपाठी यांनी कर्करोगासारख्या गंभीर आजाराचा सामना करताना वेळेत निदान आणि योग्य उपचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

आयुर्वेद आणि आधुनिक वैद्यकीय शास्त्राची सांगड घातल्यास कर्करोग प्रतिबंध आणि उपचारांमध्ये क्रांतिकारी बदल घडू शकतात, असे सांगितले.

कॅन्सर व्यवस्थापनामध्ये आयुर्वेदात अनेक प्रभावी आणि आशादायी उपचार उपलब्ध आहेत. यामुळे रुग्णांचे जीवनमान सुधारण्यास मोठी मदत होते. वैद्यकीय अनुभव आणि संशोधनाच्या जोरावर या उपचार पद्धती अधिक सक्षम करण्याची गरज आहे, असे डॉ. अविनाश कदम यांनी नमूद केले.

गुरुकुल कॅम्पसचे संचालक प्रा. जी. पी. गर्ग यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, अशा आरोग्य शिबिरांमुळे केवळ जनजागृती होत नाही, तर आजाराचे प्राथमिक टप्प्यात निदान होऊन रुग्णाला वेळेत उपचार मिळणे शक्य होते. प्रा. ओ. पी. सिंग, प्रा. अजयकुमार गुप्ता, डॉ. देवेश शुक्ला, प्रा. मीना आहुजा आणि डॉ. राजीव कुमार यांच्यासह विद्यापीठाचे वरिष्ठ डॉक्टर्स, संशोधक आणि अधिकारी उपस्थित होते.

## ‘क्रिएटिव्ह इंजिन एक्स्पो २०२६’मधून उलगडणार ‘ऑरेंज इकॉनॉमी’चे भवितव्य

**३० व ३१ मे रोजी पुण्यातील गणेश कला क्रीडा मंच येथे भव्य आयोजन; देश-विदेशातील नामांकित कंपन्यांचा सहभाग**

पुणे (दै. संध्या)




बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये आता पारंपरिक उद्योगांच्या जोडीला सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि डिजिटल कौशल्य यांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. मानवी मेंदूतील कल्पनाशक्तीवर आधारित ‘ऑरेंज इकॉनॉमी’ अथवा ‘क्रिएटिव्ह इकॉनॉमी’ ही भारताच्या आर्थिक प्रगतीची नवी दिशा ठरत असून त्याच संकल्पनेवर आधारित ‘क्रिएटिव्ह इंजिन एक्स्पो २०२६’चे आयोजन येत्या ३० आणि ३१ मे रोजी गणेश कला क्रीडा मंच,पुणे येथे करण्यात आले आहे. अशी माहिती मुख्य आयोजक सृजन कॉलेज ऑफ डिझाईनचे संस्थापक संतोष रासकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे श्रमिक पत्रकार भवन येथे झालेल्या परिषदेला आयआयसीटीचे संचालक आशिष कुलकर्णी, प्रशांत महाडीक - डायरेक्टर, शारदा बिज़नेस सोल्यूशन प्रा लि., निखिल हळ्ळी डायरेक्टर अरेना, विनीता बच्छानी - डायरेक्टर मोशन पिक्चर्स स्कूल आदी मान्यवर उपस्थित होते.

एक्स्पो विषयी अधिक माहिती देताना संतोष रासकर म्हणाले, हा एक्स्पो केवळ कला, ॲनिमेशन किंवा तंत्रज्ञानाचा मेळावा नसून भारतातील भविष्यातील अब्जावधी रुपयांच्या क्रिएटिव्ह अर्थकारणाची झलक ठरणार आहे. असल्याचे आयोजकांनी सांगितले. जगभरात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल आणि क्रिएटिव्ह क्षेत्रामुळे रोजगार, गुंतवणूक आणि आर्थिक विकासासाठी नवे मार्ग खुले होत आहेत. यामुळे भारतासारख्या विकसनशील देशाला जागतिक स्तरावर मोठी संधी निर्माण झाली आहे.

सध्या जागतिक स्तरावर ‘ऑरेंज इकॉनॉमी’चा वाटा GDP मध्ये सातत्याने वाढत असून ॲनिमेशन, गेमिंग, VFX, डिजिटल डिझाईन, व्हर्च्युअल रिॲलिटी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित क्रिएटिव्ह सोल्यूशन्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होत आहे. केंद्र सरकारनेही डिजिटल आर्ट आणि क्रिएटिव्ह इंडस्ट्रीला राष्ट्रीय आर्थिक प्रगतीचा महत्त्वपूर्ण घटक म्हणून मान्यता दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला जागतिक ‘क्रिएटिव्ह इकॉनॉमी’चे केंद्र बनवण्याचे व्हिजन मांडले असून त्यासाठी विविध धोरणात्मक पावले उचलली जात आहेत. आयआयसीटी चे डायरेक्टर आशीष कुलकर्णी यांनी ही माहिती दिली महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेला ‘पुणे-मुंबई AVGC-XR कॉरिडॉर’ हा या क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. AVGC-XR म्हणजे Animation, Visual Effects, Gaming, Comics आणि Extended Reality या क्षेत्रांचा समावेश असलेला हा कॉरिडॉर पुणे आणि मुंबई या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडून सर्जनशील उद्योगांचे नवे केंद्र निर्माण करणार आहे.

शिक्षण, संस्कृती आणि तंत्रज्ञानाचा मजबूत पाया असलेल्या पुणे शहराला यामुळे देशाचे ‘क्रिएटिव्ह कॅपिटल’ बनण्याची मोठी संधी मिळणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. या एक्स्पोमध्ये देश-विदेशातील सुमारे ३५ नामांकित कंपन्या आणि स्टुडिओ सहभागी होणार आहेत.